२३ नोव्हेंबर
१९६८

माणूस

किंमत
चाळीस पैसे

## discovery tour of india by world bank chief

New Delhi, November 14,

Food, fertilisers and family planning will be the dominant subjects of discussion between the World Bank President, Mr. Robert McNamara, and Indian leaders here next week.

Mr. McNamara who flies into the capital on Sunday afternoon, will have a tight schedule awaiting him for his seven-day "discovery" tour of this country.

He will go to farms, visit factories, talk to Ministers, Secretaries and the planners, and meet industrialists and scientists to get a composite picture of India's progress and problems.

On Monday afternoon, Mr. McNamara will have discussions on the Fourth Plan programmes with the deputy chairman of the Planning Commission, Dr. D. R. Gadgil, and members of the Commission.

The same evening, he will meet the Minister of Health to know about the impact of the family planning campaign in this country and the steps proposed to extend it in the years to come.

Later, the Cabinet Secretary, Mr. D. S. Joshi, the Commerce Secretary, Mr. K. B. Lal, the Secretary for Industrial Development, Mr. N. N. Wanchoo, and the Finance Secretary, Dr. I. G. Patel, will apprise Mr. McNamara of the working of various economic policy measures and the efforts made in recent years to relax, if not remove, controls and irksome restrictions on trade and industry.

On Monday night, he will dine with the Prime Minister, Mrs. Gandhi.

--the 'Times of India' News Service

हे १९२७ साल असते
कुणी एखादा गांधी
आपला सेनापती असता
तर सायमन कमिशनच्या
या नव्या आवृत्तीविरुद्ध
असंतोषाचा, बहिष्काराचा

या विषयाची
अर्थशास्त्रीय चर्चा
प्राचार्य व्ही. वाय. कोल्हटकर
या अंकी

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : सव्विसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
**संपादक**
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक :
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

---

स. न. नोव्हेंबर, १६

आजच 'माणूस'चा नवा अंक पाहण्यात आला. कोण्या निंभोरकर नामक वाचकाने दिवाळी अंकातील 'राजू' मुळीच न आवडल्याचे आपणांस कळविले व आपण त्या पत्राला प्रसिद्धी ठळक ठिकाणी दिली आहे. माझा अनुभव अगदी उलट आहे. मला राजूची पत्रे फारच आवडली. मी गेली ४० वर्षे माध्यामिक शिक्षक आहे व आदर्श विद्यार्थी कसा असावा याबद्दल साहजिकपणे मला विचार करावा लागतो. माझ्या मते राजू हा आदर्श विद्यार्थी आहे. मी त्याची सर्व पत्रे कौतुकाने व आवडीने वाचली. अनेक विद्यार्थ्यांना व काही सहकाऱ्यांनाही ती वाचण्याची शिफारस केली. मला राहवले नाही म्हणून हे पत्र मी लिहिले आहे.

**मो. धों. धोपेश्वरकर**, इगतपुरी.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

---

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# गोवा अधिवेशन

गोव्याच्या रम्य परिसरात अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन अत्यंत निराशा करीत, परवा पार पडलं. तीन दिवसांच्या ह्या अधिवेशनात उपस्थितांची संख्या अगदीच कमी होती. काँग्रेस अध्यक्षांची मिरवणूकही काहीच गाजली नाही. खुद्द गोवेकरांनी तर कमालच केली. त्यांनी अधिवेशनावर जवळ जवळ जणू बहिष्कारच घातला होता. गोवा स्वतंत्र झाल्यापासून काँग्रेसला गोव्यात काहीच स्थान उरले नाही. पहिल्या निवडणुकांत गोवा विधानसभेच्या सर्वच्या सर्व जागा लढवूनदेखील काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. मागच्या निवडणुकांत काँग्रेस उतरलीच नाही. फक्त लोकसभेच्या दोन्ही जागा लढवल्या, तर तेथेही काँग्रेस उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या. त्यानंतरही गोव्यात परिस्थिती अशी कधी पालटली नाहीच. युनायटेड गोवन्स किंवा महाराष्ट्रवादी गोमांतक काँग्रेसमध्ये सामील व्हायच्या वावड्या मधनं मधनं उठत तेवढ्याच ! परंतु स्वतंत्रांच्या पाठिंब्यानंतर यु. गो. चं काँग्रेसप्रेम साफ नाहीसं झालं आहे; आणि श्री. पुरुषोत्तम काकोडकरांचा अडसर आहे तोपर्यंत म. गो.– काँग्रेस युती जवळ जवळ अशक्यच आहे. आणि यु. गो.– म. गो. आहेत तोपर्यंत काँग्रेस किंवा अन्य कोणत्याही पक्षास गोव्यात मान्यता लाभणे कठीण आहे. ह्या अशा पार्श्वभूमीवर गोव्यात अधिवेशनाचा पसारा मांडला गेला, तो श्री. काकोडकरांच्या काँग्रेसकृत लाडांमुळे !

अशा परिस्थितीत गोवा काँग्रेस अधिवेशन यशस्वी होणं कठीणच होतं. गेली वीस वर्षे सातत्याने देशाचं नेतृत्व करीत आलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात ठराव पास झाले ते फक्त दोनच. एक दारुबंदीविषयक व दुसरा पाणीविषयक ! अन्य कुठलेही ठराव विशेष चर्चिलेही गेले नाहीत. मुळातच सभासदांची उपस्थिती कमी, त्यांतच उपस्थितांतल्या बहुसंख्यांचे औदासीन्य ! काँग्रेस अधिवेशनापेक्षा गोव्याच्या निसर्ग-सौन्दर्यातच बहुसंख्यांनी विशेष रस घेतला. काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनात काही राष्ट्रीय समस्यांचा, प्रश्नांचा विचार होईल, त्यावर तोडगे शोधून काढले जातील, अशा काहींच्या अपेक्षा असल्यास त्यांत वावगे काहीही नाही; परंतु दारू-बंदीविषयक पोकळ ठराव– त्यावरील निष्फळ चर्चा ह्यांतच अधिवेशन यशस्वी

# पोकळ ठराव, निष्फळ चर्चा

झाल्याचं समाधान श्री. निजलिंगप्पांनी मानावं, हे मात्र खरोखरच देशाचं दुर्दैव ! काँग्रेसच्या चालू असलेल्या अधोगतीचंच हे प्रतीक आहे. एकेकाळी देशाला स्वातंत्र्य-लढ्याला जुंपून प्रचंड संघटना उभी करणाऱ्या ह्या पक्षाचं आजचं स्वरूप पाहिलं म्हणजे वाईट वाटतं– आणि त्यापेक्षा जास्त खेद होतो तो ह्या गोष्टीचा, की वीस वर्षांत दुसरा कोणताही पक्ष तोडीस तोड म्हणून उभा ठाकू शकलेला नाही ! केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संपानंतरची परिस्थिती, देशातील मंदीची लाट, आर्थिक परावलंबन, तांत्रिक आयात, नागभूमी, आसाम, चीन-पाक युती असे शेकडो प्रश्न आज देशाला भेडसावीत असताना, त्यांची साधी चर्चाही ह्या सत्तास्थानी असलेल्या पक्षानं करू नये व सारा वेळ दारूबंदीसारख्या निरर्थक ठरावावर खर्च करावा ही बाबच मुळी खेदजनक आहे ! दारूबंदी व खेडोपाडी पाणीपुरवठा ह्यावरील ठरावही अत्यंत मिळमिळीत व कुठलंही निश्चित असं मार्गदर्शक धोरण न दाखवणारेच आहेत.

गोमंतकात असताना उपपंतप्रधान श्री. मोरारजीभाई हे पणजीतील एका सभेत एक सत्य परखडपणे बोलून गेले, ह्याबद्दल मराठी व गोवेकर जनता त्यांना निश्चितच धन्यवाद देईल. "कोकणी ही मराठीचीच बोली भाषा आहे. गुजराथीची जशी कच्छी तशीच मराठीची कोकणी !" हे परखडपणे सांगून मोरारजीभाईंनी बऱ्याच जणांची तोंडं बंद केली आहेत. तद्वतच कोकणीसाठी मराठीचीच देवनागरी लिपी योग्य आहे, हेही त्यांनी मोकळेपणाने सांगून कोकणीसाठी रोमन लिपीच्या वापराचा प्रचार करणाऱ्यांचा समाचार घेतला आहे. वास्तविक कोकणी, गोवा, महाराष्ट्र ह्याचे संबंध कोणी विशद करून सांगावेत ही आवश्यकताच मुळात नाही; परंतु तरीही, काहींनी, राजकीय हेतूंनी प्रेरित होऊन, कोकणी भाषच्या स्वतंत्र अस्तित्वाचा शोध लावला व कोकणी मराठीपासून अलग भाषा असल्याचा अट्टाहास धरला. ह्या दुराग्रही व्यक्तींत काही मान्यवर नेते आहेत, काही साहित्यिकही आहेत त्यांना हे परस्पर उत्तर मिळालं हे फार चांगलं झालं !

ह्याच सभेत उपपंतप्रधानांनी, देवनगरी लिपी सर्वच भारतीय भाषांच्या लेखनासाठी उपयुक्त असल्याचाही निर्वाळा दिला. राष्ट्रीय एकात्मता मंडळानं ह्या उद्गारांचा अवश्य विचार करावा. सुधारित देवनागरी लिपी सर्वच भारतीय भाषांसाठी वापरली गेली तर, भाषांच्या शिक्षणातला अडसर दूर होईल; व सर्वमान्य अशी भारतीय भाषा आपोआप सर्व भाषांच्या मिश्रणातून निर्माण होईल. पू. विनोबांनी हा प्रयोग सुरू केला होता. सरकारनं, एकात्मता समितीनं त्याचा पाठपुरावा केला पाहिजे.

# यादवीच्या उंबरठ्यावर

पाकिस्तानचे अध्यक्ष आयुबखान ह्यांच्यावर भरसभेत गोळ्या झाडून, त्यांच्या खुनाचा प्रयत्न एका युवकाने परवा पेशावर येथे केला. हा युवक तांत्रिक प्रशालेचा विद्यार्थी असल्याचे मागाहून जाहीर करण्यात आले आहे. गेले काही दिवस पाकिस्तानी विद्यार्थ्यांमध्ये असंतोष धुमसतो आहे. त्याचा रोख शैक्षणिक परिस्थिती, परीक्षा-पद्धती इत्यादींवरच असला तरी लोकशाही तत्त्वप्रणालीच्या आरोळ्या ठोकून विद्यार्थ्यांमधील ह्या असंतोषाचा फायदा विरोधीपक्षीय घेऊ पाहत आहेत. पाकिस्तानचे माजी परराष्ट्रमंत्री श्री. भुट्टो हे ह्या विरोधी नेत्यांमध्ये प्रमुख आहेत. श्री. भुट्टो ह्यांना पुढे आणण्यात प्रे. आयुबखानच बव्हंशी कारणीभूत झालेले आहेत. त्यांच्या परराष्ट्र मंत्रालयातील कारकीर्दीमुळे आयुब-भुट्टो ह्यांच्यांत वैमनस्य आलं व भुट्टो ह्यांना राजकीय हौतात्म्य स्वीकारावं लागलं. हे राजकीय हौतात्म्य, भारत-विरोधात आपण आयुबखानांपेक्षा काकणभर सरसच आहोत हे जनतेला पटवून देण्यात त्यांना आलेलं यश, त्यांच्या लोकशाहीच्या घोषणा व तरुण आणि विद्यार्थी ह्यांना आकर्षून घेण्याचे त्यांनी उचललेले पाऊल ह्यांमुळे भुट्टोंची लोकप्रियता आज वधारली आहे. त्यांच्याच प्रेरणेने आज ठिकठिकाणी असंतोषाचे बावटे उभारले जात आहेत. कराची विद्यापीठ बेमुदत बंद झाले आहे, रावळपिंडीत कर्फ्यूची अंमलबजावणी चालू आहे, पेशावरात विद्यार्थ्यांना पांगवण्यासाठी पोलिसांना बलप्रयोग करावा लागत आहे. ह्या साऱ्या असंतोषाचा कळसच श्री. आयुबखान ह्यांच्या खुनाच्या प्रयत्नाने झाला आहे!

ह्या साऱ्यांच्या मागे श्री. आयुबखानांची हुकूमशाही राजवट कारणीभूत आहे, हेही तितकंच खरं. जीना लियाकतअलीखान, सुऱ्हावर्दी व आयुबखान हे सारे एकमेकांना दूर सारून अधिकारारूढ झाले. आयुबखानांनी प्रथम लष्करी राजवट आणली व नंतर बेसिक डेमॉक्रसीची घोषणा केली. पण ही 'बेसिक डेमॉक्रसी'ची घोषणाच मुळात फसवी होती. पाकिस्तानात आयुबखानांनी राबवली ती एकतंत्री हुकूम-

शाहीच ! सिंध, बलुचिस्तान, वायव्य प्रांत व पंजाब ह्या पश्चिम पाकिस्तानातील चार राज्यांची स्वायत्तता रद्द करून एकतंत्री राज्याची उभारणी करून त्यांनी आपल्या हुकूमशाहीची पकड घट्ट आवळायला सुरुवात केली. त्यामुळे सिंधी मुसलमान चिडले. बलुची टोळया व पाक पोलीस ह्यांच्या चकमकी सुरू झाल्या. आज ह्या चकमकींमध्ये कित्येक बळी पडत आहेत. वायव्य प्रांतातल्या टोळ्या झगडताहेतच. श्री. आयुबखानांच्या ह्या अलीकडच्या एकतंत्री कारभाराने हा असंतोष आज धगधगतोय. श्री. भुट्टोंच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी व अन्य विरोधी पक्ष ह्या असंतोषात भर घालीत आहेत आणि चारीकडून शस्त्रसामर्थ्य पैदा केलेला पाकिस्तान यादवीच्या उंबरठ्यावर उभा असल्याचं चित्र आज दिसत आहे ! श्री. आयुबखान ह्यांच्या खुनाच्या प्रयत्नानं हाच संदेश आज तरी दिला आहे ! लोकांच्या स्वातंत्र्याचा मान ठवून श्री आयुबखान धोरण बदलून आजच्या परिस्थितीतून तरून जाऊ शकतील, की श्री. भुट्टो आपली प्यादी पुढे सरकवण्यात यशस्वी होतील ते लवकरच कळेल !

मु. ल. सोमण




# ग्यानबाचे गुऱ्हाळ

## दारूबंदीविषयी दगडूअण्णा

काँग्रेस महासमितीचे अधिवेशन पणजी येथील कुन्हा नगरात नुकतेच पार पडले. 'दारूबंदी' हा आपल्या राष्ट्रापुढील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न. त्यामुळे त्याबाबतच या बैठकीत चर्चा व्हावी, हे ओघानेच आले. त्यातून पुढचे वर्ष हे गांधी-जन्मशताब्दीचे महोत्सवी वर्ष. मग दारूबंदीचा ठराव येणार नाही तर काय होईल ? पुढच्या वर्षीच्या गांधी-जयंतीपासून–म्हणजे २ ऑक्टोबर १९६९ पासून–दारूबंदीचा कार्यक्रम क्रमशः अंमलात आणावा आणि १९७६ पर्यंत देशात संपूर्ण दारूबंदी करावी, असे ठरले.

या ठरावाबाबत जास्त माहिती घ्यावी आणि जमल्यास त्याचा अर्थही समजावून घ्यावा, म्हणून मी परवाच आमचे काँग्रेसवाले मित्र देशभक्त दगडूअण्णा ढेकळे यांच्याकडे गेलो होतो. दगडूअण्णा हे काँग्रेस महासमितीचे सभासद नसले तरी गोव्याला गेले होते. महासमितीचे अनेक लोक ह्यांचे मित्र असल्यामुळे त्यांना अंतःस्थ सगळी माहिती असतेच. म्हणून त्यांच्याशी चर्चा करणे मला नेहमीच आवडते. काही काही बाबतींत तर त्यांची मते फारच मौलिक आणि सडेतोड असतात. आज त्यांच्या घरी गेलो तेव्हा ते नुकतेच झोपेतून उठले होते आणि चहा पीत होते.

चहा पिता पिता पहिलाच प्रश्न मी टाकला–

"काय, गोवा काय म्हणतोय ?"

"सध्या साली शीझन नाही अजून–" दगडूअण्णा बोलले. "पण ब्रँडी या दिवसांत फस्कलास. आता शीझन हुईल सुरू हितनं. मग खरी मजा."

" ते नव्हे हो. मी कॉंग्रेस महासमितीच्या अधिवेशनाबद्दल बोलतोय. कसं काय झालं अविवेशन ?"

" अविवेशन आमचं नेहमीच चांगलं होतं. दहा–पाच लाख खर्च झाले असतील. प्रतिनिधी फार आले नाहीत. त्यामुळं व्यवस्था झकास होती. बाकी हिंडावं तर गोव्यात हां. काय साला नेचरची ब्यूटी." दगडूअण्णांनी समाधानाने डोळे मिटून घेतले.

" त्या दारूबंदीच्या ठरावाचं काय ?" न राहवून मी घोडे पुढे दामटलेच.

" हां हां, तो ठराव ना ? केला ना आम्ही पास. म्हणजे तक्रार नको मागनं. बठक भरलीच आहे तर काहीतरी काम केलं पायजे."

दगडूअण्णांची ही मूलगामी प्रस्तावना फार वेळ लांबू नये म्हणून मीच त्यांना वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेला हा ठराव वाचून दाखवला आणि त्यावर कुणाकुणाची भाषणे झाली, तोही वृत्तांत वाचून दाखवला. मग दगडूअण्णांना एकेक गोष्टी आठवू लागल्या. मग या ठरावाबाबत त्यांचा अधिकृत अभिप्राय विचारल्यावर ते गंभीरपणे म्हणाले,

" आता सगळ्या गोष्टी माझ्या लक्षात आल्या. २ ऑक्टोबर १९६९ पासून दारूबंदीचा प्रोग्राम आम्ही अंमलात आणणार आहोत. आन ७६ पर्यंत सगळं काम खलास करून टाकणार आहोत. ही तारीख ठरवण्यात आम्ही फारच हुशारी दाखवलेली आहे–"

" ती कोणती ?" मी विचारले.

" पहिली गोष्ट म्हणजे म्होरल्या २ ऑक्टोबरपर्यंत कुणी कितीबी प्या. त्याला काय डर नाही. दुसरं म्हंजे दारूबंदीचं धोरण हळूहळू अमलात येनार. ७६ साल म्हंजे लई लांब. दमादमानं काम केलं तरी चालनार आहे–"

" पण दमादमानं म्हणजे काय ठरवलंय ? त्याची काही योजना तयार केलीय का ?"

" योजना कशाला पायजे करायला ?" – दगडूअण्णा रागावून म्हणाले. " दर सालाला थोडं थोडं प्रमान कमी केलं म्हंजे झालं. म्हंजे समजा की, पयल्या सालाला जर मानूस डझन वाटल्या वर्साला घेत आसल तर आमी सांगनार की, बावारे, या टायमाला आता धाच घे. पुढच्या सालाला आठ घे. त्याच्या म्होरं सा घे. आसं करीत जायचं."

" म्हणजे तसा कायदाच करणार तुम्ही ? का आपला नुसता प्रचार ?" मी शंका विचारली.

" प्रचारानं काई होत न्हाई. साला कायदाच केला पायजे. तरच लोक दचकत्यात. हातभट्टीसुद्धा थोडी थोडी कमी काढा म्हणून सांगणार. आन पोलिसांनीसुद्धा दर सालाला हप्ते कमी कमी करीत न्यायचे. १९७६ मधे सर्वच खलास–"

" बरं, ते जाऊ द्या. डॉ. सुशीला नायर म्हणाल्या की, एका मंत्र्यांनीच व्हिस्की चोरीला गेल्याची फिर्याद करावी ही फार वाईट गोष्ट आहे. "

" म्हंजे चोरी झाली तरी फिर्याद बी करू नै म्हणता का ? " दगडूअण्णा उसळले. " मग पोलीसखातं कशानं है ? काही बेकायदा झालं तरी पोलीसखात्याला त्याची वर्दी असायलाच पायजं. त्यातून ल्हान सान गोष्ट आसली तर गोष्ट वायली. ही तर व्हिस्की चोरीला गेलेली.. किती पंचाईत झाली संध्याकाळी त्या बाबाची ! त्याचा काय विचार ?"

दगडूअण्णांचे हे म्हणणे खरे होते. वास्तविक त्या मंत्र्यांची झालेली गैरसोय ध्यानात घेऊन चोराचा निषेध करायला हवा होता. त्याच्याऐवजी मंत्र्यावरच शिव्याशापाचे प्रहार ? बाटलीचा मालक तो. त्याच्याबद्दल कसलीच सहानुभूती नाही. म्हणजे कमाल आहे की नाही ? चोराबद्दल मात्र नायरबाई एक अक्षर बोलल्या नाहीत. दारू आणि चोरी असे दोन गुन्हे त्याने केलेले असूनसुद्धा...

" आता एकच प्रश्न हा अण्णा. " मी मान डोलवून म्हटले. " १९७६ पर्यंत हा कार्यक्रम पूर्ण करायचा असं तुम्ही ठरवलं आहे. पण ते जमणार आहे का ? शहात्तरपर्यंत काँग्रेस सरकार–"

" तीच मेख आहे"–अण्णा मला डोळा घालून म्हणाले, "अहो, कुणी पुढचं बगितलंय ? ठराव करा म्हणाले, केला, बहात्तरातच इलेक्शनं हुनार. त्यातच काय हुतय आन् काय न्हाई म्हणून आमची पाक्पूक होतीय आत्तापासनं...होला हो, म्हणायचं. सोडून द्यायचं. हे पंचेवाले येडेच हैत तिच्या मायला--"

शेवटचा शब्द ऐकल्यावर मी उठलोच. अण्णा आता भलतेचं खुषीत आले आहेत हे मी ओळखले. आता थांबण्यात काही अर्थ नव्हता. म्हणून मी मुकाटचानं त्यांचा निरोप घतला आणि बाहेर धूम ठोकली.

## काँग्रेस संघटना बरखास्त ?

दारूबंदीचे जाऊद्या. त्याचे काय मोठेसे ! झाली आणि नाही झाली तरी फारशी कुणाची गैरसोय होईल असे वाटत नाही. पण या अधिवेशनात काँग्रेस महासमितीचे एक सभासद विभूती मिश्रा यांनी मात्र एक विधान करून मोठीच खळबळ उडवून दिली एवढे खरे. हे साहेब म्हणाले, " गांधीजींच्या मार्गाने आपल्याला जायचे आहे असे आपण म्हणतो. मग गांधीजी काँग्रेसबद्दल काय म्हणाले ते आपल्या लक्षात आहे काय ? स्वातंत्र्य मिळाल्यावर काँग्रेस ही राजकीय संघटना म्हणून बरखास्त करावी आणि तिचे लोकसेवा संघात रूपांतर करावे, असे बापूजी म्हणाले होते. गांधींचे हे मत विचारात घेऊन आपण खरोखरीच काँग्रेस बरखास्त करण्याचा निर्णय करू या. तरच गांधीजन्मशाब्दी आपण खऱ्या अर्थाने साजरी केल्यासारखे होईल. "

विभूती मिश्रा यांचे हे भाषण ऐकून महासमितीत शांतपणे भाषणे ऐकत बसलेल्या काँग्रेसच्या सभासदांत प्रचंड खळबळ उडावी हे अगदी स्वाभाविक आहे. कुणीही उठावे आणि काहीही आचरटासारखे बोलावे याला काही अर्थ आहे काय ? काँग्रेस संस्था म्हणे संपवा. अन् मग करा काय ? आधीच बेकारीचा प्रश्न किती बिकट झाला आहे. लक्षावधी तरुण माणसे उद्योगधंदा नाही म्हणून वणवण हिंडताहेत. एक कारखाना बंद पडला तर शेकडो लोक अन्नाला मोताद होतात. इथे तर काँग्रेसचे शेकडो कारखाने केंद्रीय मंत्रीमंडळापासून तो तालुका पंचायत समितीपर्यंत. उद्या काँग्रेस विसर्जित करून टाकली तर या सगळ्या कारखान्यात पोटासाठी आशेने चिकटलेल्या हजारो थोर पुरुषांचे काय करायचे ? सत्तेवरून दूर गेल्यावर त्यांना कुणीतरी विचारील काय ? त्यांच्या डोक्यावरच्या पांढऱ्या टोपीला जेवढी किंमत पडते तेवढीसुद्धा त्यांना स्वतःला बाजारात मिळणे कठीण ! मग त्या गरिबांनी जगावे कसे ? आत्ताशी कुणी कुणी एखादा बंगला आपल्या बायकोच्या नावाने बांधला असेल. पण तीन मुले आणि चार मुली यांच्यासाठी त्यांना अजून काही करायचे आहे. आत्ता कुठे त्यांच्या मांडीखाली एखादी मोटर दिसू लागली आहे. पण त्यांचा जावई अजून विमानाने प्रवास करू शकत नाही. आता कोठे सहकारी बँकेतल्या लाख-दोन लाखाची उलाढाल त्यांनी चालवली आहे. पण बँकेत वरेच पैसे अद्यापि पडून आहेत. त्यांचे काहीतरी केलेच पाहिजे. अजून कित्येक गावे अशी आहेत की जेथे आलिशान हॉटेल नाही किंवा अप्टुडेट सिनेमा थिएटर नाही. यांच्याशिवाय ही गैरसोय कोण दूर करणार ? परदेशांतून नाना प्रकारची निमंत्रणे एकसारखी येत आहेत. तिकडे कुणीतरी दौरे काढणे आवश्यकच आहे. आमची ही मंडळी आहेत म्हणून ही मोठीच गरज भागवली जात आहे. उद्या काँग्रेस संघटनेचा अवतार समाप्त झाला तर या सगळ्या अडचणींचा परिहार कसा करायचा ? विभूती मिश्रा त्यांचे निराकरण कसे करणार आहेत ? बोला. मिश्राजी, उत्तर द्या. उचलली जीभ अन् लावली टाळ्याला, असे करू नका.

आणि हे सगळे देशातले झाले ! आंतरराष्ट्रीय राजकारणाचे काय ? सगळ्या जगात शांतता फैलावण्याचे असिधाराव्रत आपल्या देशाने घेतले आहे ते सिद्धीस नेण्याची ताकद काँग्रेस संघटनेशिवाय अन्य कुठल्या संघटनेत आहे काय ? पाकिस्तानच्या बाबतीत कर्णाचे औदार्य, चीनच्या बाबतीत धर्मराजाची न्यायप्रियता, रशियाच्या संदर्भात एखाद्या भक्ताची नवविधाभक्ती, अमेरिकेच्या संबंधात लीन ' याचकाची नम्रता–'ही आपली श्रेष्ठ भारतीय परंपरा कोण बरे जतन करील ? छे: छे: ! काँग्रेस संघटना या देशात अजिबात नाही या कल्पनेनेच माझ्या अंगावर काटा येतो. मग वर्तमानपत्रांत बातम्या तरी रोज काय येणार आणि आपली करमणूक तरी कशाने होणार ? निदान त्यासाठी तरी ही मंडळी पाहिजेतच. ○

# ट्रॅक्टर आणि बॉयलर

चंद्रशेखर मराठे

केंद्रीय अन्न व शेतकी मंत्रालयाच्या एका कार्यकारी गटाने आपल्या ऊसविषयक गरजांचा नुकताच आढावा घेतला. चौथ्या पंचवार्षिक योजनेअखेरपर्यंत आपल्या देशास १५० लाख टन ऊस लागेल, असा अंदाज आहे. यांपैकी ५० लाख टन साखरेसाठी, ८ लाख टन खांडसारीसाठी, ७२ लाख टन गुळासाठी व १८ लाख टन बियाणासाठी लागेल, असा अंदाज आहे.

उसाच्या उत्पादनाचे मागील काही वर्षांचे आकडे पाहता ही मागणी पुरी करता येईल असे वाटते. १९६०–६१ साली १०६ लाख टन ऊस उत्पादन झाले होते. ते हळूहळू वाढत १९६५–६६ साली १२१ लाख टन झाले. ही उत्पादनवाढ उसाखालील क्षेत्र वाढवून झालेली नाही, हे नमूद केले पाहिजे. १९६०–६१ पासून उसाखालील क्षेत्र आहे तसेच कायम आहे. १९४९–५० हे मूळ वर्ष धरता ऊस उत्पादनाचा निर्देशांक १९६०–६१ साली १८३·९ होता तो १९६५–६६ साली १९७ झाला.

अन्नधान्याची गरज वाढती असल्याने उसाखालील क्षेत्र न वाढवता ऊस उत्पादनात वाढ कशी होईल, यावर भारतीय शेती शास्त्रज्ञांचे लक्ष केंद्रित झाले आहे. कार्यकारी गटाचा ऊस उत्पादनवाढ कार्यक्रम याच तत्त्वावर आधारित आहे. चौथ्या योजनेसाठी या कार्यक्रमावर १३७·६० कोटी रु. ची तरतूद करावी अशी या गटाची शिफारस आहे. पैकी ११७·१९ कोटी रु. पाणीपुरवठ्याच्या छोट्या योजनांसाठी आहेत. या रकमेपैकी ९३·७५ कोटी रु. कर्ज व २३·४३ कोटी रु. मदत म्हणून राज्यांना देण्यात येणार आहेत. ऊस उत्पादनवाढीवरील सर्वच्या सर्व खर्च केंद्राच्या साहाय्यातून होणार आहे.

ऊस उत्पादनवाढीचा हा कार्यक्रम ११ कलमी असून त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो : (१) पाणीपुरवठ्याची सोय, (२) खतांचा पुरवठा, (३) सुदृढ व चांगल्या वियाणाचा पुरवठा, (४) उसाच्या पैशाचा हिशेब उताऱ्याच्या आधारावर त्याच वर्षात होईल यावावत पद्धती शोधून काढणे, साखर उत्पादनासाठी बीटची लागवड व्यापारी पद्धतीवर करण्यावावत प्रयोग सुरू आहेत. या कामासाठी चौथ्या योजनेत १.५० कोटी रु. ची तरतूद केली आहे. पाणीपुरवठा असलेल्या भागांत बीटची लागवड रब्बी पीक म्हणून करता येईल असे प्रयोगाअंती सिद्ध झाले आहे. युरोप, अमेरिका व रशियामधील रब्बी बीट पिकाशी तुलना करता आपले येथील रब्बी बीटचे उत्पादन आशादायक वाटते. वरील दीड कोटी रु. संपूर्णपणे केंद्र सरकारकडून खर्च व्हावयाचे असून, त्यांपैकी १ कोटी ४० लाख रु. डिफ्युजर्स व इतर यंत्रसामग्री घेण्यासाठी कारखान्यांना कर्ज म्हणून देण्यासाठी राखून ठेवण्यात आले आहेत. याच योजनेखाली प्रायोगिक बीट लागवडीचे निष्कर्ष अधिक व्यापक प्रमाणावर पडताळून पाहण्यासाठी पायलट प्रकल्पांची आखणी करण्यात आली आहे. सुरुवातीस पंजाव, हरियाना, बिहार येथे प्रत्येकी एक व उत्तर प्रदेशमध्ये दोन असे प्रकल्प आहेत. याच राज्यांत चार डिफ्युजन प्लँटस बसविण्याची योजना आहे. १९६७–६८ मध्ये श्री गंगानगर येथील प्रायोगिक डिफ्युजन प्लँटमध्ये २६ लाख टन बीट साखरेचे उत्पादन करण्यात आले.

अंतर्गत मागणी, निर्यातवाढ व राखीव साठा या तीनही आघाड्यांवरील मागणीस पुरे पडेल एवढे ऊस उत्पादन करण्याचे काम अवघड आहे. ऊस लागवडीच्या पद्धतीत सुधारणा झाल्याशिवाय हे शक्य नाही. यासाठी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ शुगरकेन रिचर्स या लखनौ येथील संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञांनी ऊस लागवडीचे नवीन तंत्र शोधून काढले आहे. उत्तर भारतामधील राज्यांत या तंत्रायोगे उसाचे उत्पादन वीस टक्क्यांहून अधिक वाढेल असा अंदाज आहे. या तंत्रास ' आय. आय. एस. आर. ८३२६ ' असे नाव देण्यात आले असून १७ महिन्यांच्या पिकात एका हेक्टरमध्ये (अडीच एकर) १५२ टन ऊस पैदा करता येईल, असा संशोधकांचा दावा आहे.

उसाची लागवड करण्यापूर्वी ९०-१०० सेंटिमीटर अंतरावर सुमारे ४५ सेंटिमीटर खोल व २० सेंटिमीटर रुंद अशा हाळी पाडण्यावर हे तंत्र आधारित आहे या तंत्राची प्रायोगिक चाचणी नुकतीच पूर्ण झाली असून प्रत्यक्ष शेतात अजून याचा प्रयोग झालेला नाही. या वर्षी लखनौच्या आसपासचे ३० लहानमोठे शेतकरी या तंत्राचा अवलंव करणार असून संशोधक शास्त्रज्ञ या व्यापक प्रयोगावर देखरेख ठेवणार आहेत. १९६९–७० मध्ये या पद्धतीखाली किती ऊस-क्षेत्र आणावे हे या व्यापक प्रयोगावर अवलंबून ठेवण्यात आले आहे. ○

• • • • • • • •


# निक्सन आणि भारत

• • • • • • • •

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक अत्यंत चुरशीची होऊन रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार रिचर्ड एम्. निक्सन निवडून आले. निक्सन यांच्या विजयाचा अर्थ काय ? अमेरिकेच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणावर आणि विशेषत: भारतासंबंधीच्या धोरणावर त्याचे कोणते परिणाम होतील, हे प्रश्न केवळ अमेरिकेच्याच नव्हे तर जगाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत; कारण अमेरिका जगातील सर्वांत सामर्थ्यशाली राष्ट्र आहे.

निक्सन यांच्या निवडीने अध्यक्षपदाची सूत्रे आठ वर्षांनंतर पुन: रिपब्लिकन पक्षाकडे गेली आहेत. चार वर्षांपूर्वी जॉन्सन यांनी अध्यक्षीय निवडणुकीच्या इतिहासात सर्वांत जास्त मते मिळवून उच्चांक केला होता. पण कारकीर्दीच्या अखेरच्या वर्षांत त्यांच्या लोकप्रियतेचे पारडे खाली आले. आपण स्वत: पुन: निश्चित निवडून येत नाही हे त्यांना स्पष्ट दिसून आले तेव्हा उभे राहून अपयशाची नामुष्की पत्करण्यापेक्षा स्वत:होऊन निवृत्त होण्यानेच आपला आब राहील हे जॉन्सन यांनी ओळखले व तसा निर्णय जाहीर केला.

जॉन्सन अप्रिय झाले ते मुख्यत: व्हिएटनाम युद्धासंबंधीच्या धोरणाने. त्यांच्या कारकीर्दीत अमेरिका या युद्धात अधिकच गुंतत गेली, पण त्या मानाने विजय दृष्टि-पथात दिसेना. अमेरिकन पैसा व सैनिकांची हानी किती वर्षे चालू ठेवायची ? हे युद्ध थांबवावे. अमेरिकेने त्यातून अंग काढून घ्यावे या विचारप्रवाहाकडे अमेरिकन



रिचर्ड एम्. निक्सन

लोकमत झपाट्याने झुकू लागले. कोरियन युद्ध थांबवीन असे आश्वासन देऊन १९५२ च्या अध्यक्षीय निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार आयसेनहॉवर विजयी झाले होते. त्याचप्रमाणे व्हिएटनाम युद्ध थांबविण्याच्या प्रश्नावर या वेळी निक्सन विजयी होणार हे दिसू लागले होते. आपली व आपल्या पक्षाची घसरलेली लोकप्रियता सावरून निवडणूक जिंकावयाची असेल तर व्हिएटनाम युद्ध थांबविण्याच्या दृष्टीने त्वरित हालचाली केल्या पाहिजेत हे जॉन्सन यांनी ओळखले. उत्तर व्हिएटनामवरील बाँबहल्ल्यांची कक्षा कमी केल्याची घोषणा त्यांनी प्रथम करून उत्तर व्हिएटनामशी शांतता-वाटाघाटी करण्याची तयारी दर्शविली. उत्तर व्हिएटनामनेही अनुकूल साथ दिली. पॅरिस येथे वाटाघाटी सुरू झाल्या. उत्तर व्हिएटनामवरील हल्ले अमेरिकेने पूर्णपणे थांबविले पाहिजेत, असा आग्रह उत्तर व्हिएटनामच्या शिष्टमंडळाने वाटाघाटींत प्रथमपासून धरला. ही मागणी मान्य केल्याशिवाय वाटाघाटींत काहीही प्रगती होण्याची शक्यता नाही, असे जॉन्सन यांना दिसून आले. दरम्यान अमेरिकन लोकमत व्हिएटनाम युद्धाविरुद्ध अधिकच झुकले होते व त्याचा फायदा निक्सन यांना मिळणार असे दिसू लागले होते. हे थांबवायचे असेल तर काहीतरी नाट्यपूर्ण हालचाल त्वरित केली पाहिजे हे जॉन्सन यांनी ओळखले आणि उत्तर व्हिएटनामवरील सर्व प्रकारचे हल्ले अमेरिका एक नोव्हेंबरपासून थांबवीत असल्याची घोषणा त्यांनी ३० ऑक्टोबरला म्हणजे निवडणकीच्या आधी सहा

दिवस केली. युद्धतहकुबीच्या दृष्टीने पॅरिसमध्ये अमेरिका, दक्षिण व्हिएटनाम, उत्तर व्हिएटनाम व राष्ट्रीय मुक्ती आघाडी यांच्या प्रतिनिधींत वाटाघाटी व्हाव्यात, अशीही सूचना त्यांनी केली. पण या घोषणेस फार उशीर झाला होता. या घोषणेचा परिणाम होऊन डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार ह्युबर्ट हंफ्रे यांना पाठिंबा वाढला. पण निर्णायक विजय मिळविण्याइतका तो वाढला नाही. जॉन्सन यांची घोषणा म्हणजे निवडणूक जिंकण्यासाठी टाकलेला डाव आहे. व्हिएटनाम युद्ध थांबविण्याची प्रामाणिक इच्छा त्यामागे नाही. हंफ्रे यांनी निवडणूक जिंकल्यावर अमेरिका उत्तर व्हिएटनामवर पुन: हल्ले सुरू करील व युद्ध रेंगाळत राहील हा समज लोकांच्या मनात राहिलाच. तेव्हा अनिश्चित धोरणाचा अध्यक्ष निवडण्यापेक्षा निक्सन यांना निवडणे जास्त चांगले असे मतदारांनी ठरवून त्यांना निवडून आणले.

डेमोक्रॅटिक पक्षातील फूट व तुलनेने रिपब्लिकन पक्षात असलेली एकजूट हे निक्सन यांच्या विजयाचे दुसरे कारण. सिनेटर मॅकार्थी, रॉबर्ट केनेडी व ह्यूबर्ट हंफ्रे या तीन नेत्यांत डेमोक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळविण्यासाठी चुरस होती. रॉबर्ट केनेडींना चांगला पाठिंबा मिळू लागला होता, पण एका मारेकऱ्याच्या गोळीला ते बळी पडले. त्यानंतर पक्षाच्या मेळाव्यात हंफ्रे यांची उमेदवार म्हणून निवड झाली खरी, पण मॅकार्थींच्या गटाने त्यांना मन:पूर्वक पाठिंबा दिलेला नव्हता.

जॉन्सन राजवटीबद्दलचा असंतोष हंफ्रे यांना भोवला, हे त्यांच्या पराभवाचे तिसरे कारण. जॉन्सन यांचेच धोरण ते पुढे चालविणार, त्यांना स्वत:चे धोरण नाही, हा जॉन्सन यांचा ग्रह दूर करण्यात हंफ्रे यांना यश आले नाही.

पराभवाचे चौथे महत्त्वाचे कारण, अध्यक्षपदाची लढत दुरंगी न होता तिरंगी झाली. तिसरे उमेदवार जॉर्ज वॉलास यांना बराच पाठिंबा 'ब्लू-कॉलर युनियन वर्कर्स' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गटाकडून मिळाला. हा गट सर्वसाधारणपणे डेमोक्रॅटस्ना पाठिंबा देतो. वॉलास यांना तुलनेने थोडी मते पडली असली तरी तेवढ्यामुळे हंफ्रे यांनी बरीच 'इलेक्टोरल व्होट्स्' गमावली. कॅलिफोर्निया, इलिनोइस आणि न्यू जर्सी या तीन राज्यांतील ८३ इलेक्टोरल व्होटस् वॉलास यांच्या उमेदवारीमुळे हंफ्रे यांनी गमावली, असे तेथील डेमोक्रॅटिक नेते सांगतात. ही तीन राज्ये हंफ्रे यांनी जिंकली असती तर ते निवडून येण्याचा संभव होता.

अध्यक्षपद निक्सन यांनी जिंकले, पण काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांत मात्र डेमोक्रॅटिक पक्षास बहुमत मिळाले. या विसंगतीचा अर्थ कसा काय लावावयाचा? निक्सन अध्यक्षपदी निवडून आले याचा अर्थ त्यांच्या रिपब्लिकन पक्षाला लोकांचा पाठिंबा आहे, असे नव्हे. तसे असते तर मग काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांतही त्या पक्षास बहुमत मिळावयास हवे होते. तसे घडलेले नाही. काँग्रेसच्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षास बहुमत मिळवून देणाऱ्या मतदारांनी अध्यक्षीय निवडणुकीत मात्र डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार हंफ्रे यांचा पराभव केला. मतदारांना अध्यक्षपदी

बदल हवा होता, म्हणून अध्यक्षपदी रिपब्लिकन नेता त्यांनी निवडला. पण त्याने फारच निराळे धोरण आखू नये, यासाठी त्यावर अंकुश म्हणून काँग्रेसच्या दोन्ही गृहांत मात्र डेमोक्रॅटिक पक्षासच मतदारांनी बहुमत मिळवून दिले.

तिसरे उमेदवार वॉलास यांनी हंफ्रे यांची बरीचशी मते घेतली, हे म्हणणेही पूर्णपणे खरे नाही, असे निकालांची अधिक बारकाईने पाहणी केल्यावर दिसून येते. डेमोक्रॅटिक पक्षाच्या काही मतदारांनी सरळच निक्सन यांना मते दिली. न्यूयॉर्क राज्यातील मतदानाचे आकडे या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहेत. तेथे डेमोक्रॅटिक उमेदवारास मिळालेल्या मतांचे प्रमाण १९६४ पेक्षा १८ टक्क्यांनी घटले. एकूण मतदानापैकी फक्त ५ टक्के मते वॉलास यांना मिळाली. याचा अर्थ फुटलेल्या डेमोक्रॅटिक मतांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश तरी मते निक्सन यांना मिळाली असली पाहिजेत. उत्तरेकडच्या राज्यांतील गोऱ्या कामगारांची बरीचशी मते निग्रोद्वेष्टे उमेदवार वॉलास हे मिळवितील व त्याचा हंफ्रे यांच्या निवडणुकीवर परिणाम होईल, असे वाटले होते; पण प्रत्यक्षात तसे फारसे घडलेले नाही. उत्तरेकडच्या प्रमुख औद्योगिक राज्यांत हंफ्रे यांनीच निवडणूक जिंकली. इलिनोइस व कॅलिफोर्नियात त्यांचा पराभव झाला. या मागे वॉलास यांच्या उमेदवारीपेक्षा इतरही अनेक कारणे आहेत.

पूर्वेकडच्या प्रमुख राज्यांत ज्याने विजय मिळविला त्याने अध्यक्षीय निवडणूक जिंकली, असे एकेकाळी मानले जात असे. पण ते खरे नाही, हे या निवडणुकीने पुनः एकदा दाखवून पूर्वेकडच्या दहापैकी आठ राज्यांत हंफ्रे यांना विजय झाला. पण अध्यक्षीय निवडणूक ते हरले. अरकान्सास, लुईसियाना, मिसिसिपी, अलबामा


प्रा. अनंत काणेकर

वसंत

मासिकासाठी दरमहा लिहिणार !

चरित्रात्मक आठवणी **अ न न्ति का**

जानेवारी ६९ च्या अंकापासून वाचा.

**वा. व. रु. १५ ♠ निराशा टाळण्यासाठी आजच वर्गणीदार व्हा.**



व जॉर्जिया या दक्षिणकडील पाच राज्यांत वॉलास यांचा विजय झाला. म्हणजे निक्सन निवडून आले, ते मुख्यत: मध्य अमेरिकेतील राज्यांच्या पाठिंब्यावर.

निक्सन यांना इलिनोईसमध्ये मिळालेला विजय निर्णायक ठरला. या राज्यांतील रिपब्लिकन्स मध्यम मार्गाच्या थोडे उजवीकडे झुकणारे आहेत. गेल्या निवडणुकीतील पराभूत रिपब्लिकन उमेदवार बॅरी गोल्डवॉटर यांच्या कट्टर उजव्या गटापासून ते बरेच दूर आहेत. निक्सन यांची भूमिका सर्वसाधारणपणे अशीच राहील.

यंदाच्या निवडणुकीतील मतदानाची तुलना १९६० मधील निवडणूकीशी करता येईल. कारण त्या वेळची निवडणूकही अशीच चुरशीची होऊन जॉन केनेडी यांनी थोडया मतांनी निक्सन यांच्यावर विजय मिळविला होता. गेल्या आठ वर्षांत निक्सन यांच्या बाजूस एकूण फक्त ०.२ टक्के मतदान झुकले असल्याचे दिसते. १९६० च्या निवडणुकीत गमावली अशी सात राज्ये निक्सन यांनी या वेळी नव्याने जिंकली. त्यांपैकी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे इलिनोईस. १९६० साली या राज्यात अवघी ८८०० मते जास्त मिळवून केनेडी विजयी झाले होते. दक्षिण व उत्तर कॅरोलिनात १९६० मध्ये फार थोडया बहुमताने केनेडी यांचा विजय झाला होता. या वेळी तिरंगी लढतीत ३९ टक्के मते मिळवून निक्सन विजयी झाले.

मेन आणि वॉशिंग्टन या दोन राज्यांत हंफ्रे यांनी विजय मिळविला. पण केनेडींनी गेल्या निवडणुकीत जिंकलेली अरकान्सास, लुईसियाना व जॉर्जिया ही तीन राज्ये ते हरले. तेथे वॉलास यांचा विजय झाला.

वॉलास यांच्या उमेदवारीचा एक परिणाम म्हणजे रिपब्लिकन व डेमोक्रॅटिक या दोन्ही प्रमुख पक्षांच्या उमेदवारीत पडलेल्या मतांच्या प्रमाणात या वेळी घट झाली. चार पंचमांश राज्यांत निक्सन किंवा हंफ्रे यांपैकी कोणालाच निर्णायक बहुमत मिळालेले नाही. निक्सन ज्या राज्यांत विजयी झाले त्यांपैकी बहुसंख्य राज्यांत त्यांना ५० टक्क्यांपेक्षा कमी मते मिळालेली आहेत.

अध्यक्ष अल्पसंख्य मतांनी निवडला जाणे हे काही अमेरिकेच्या इतिहासात नवीन नाही. हॅरी ट्रुमन १९४८ च्या निवडणुकीत ४९.५ टक्के मते मिळवून चौरंगी लढतीत विजयी झाले होते. निक्सन यांना या वर्षी पडलेल्या मतांचे प्रमाण ( ४३ टक्के ) मात्र १९१२ मधील वुड्रो विल्सन यांच्या निवडणुकीनंतर सर्वांत कमी आहे. त्या वर्षी विल्सन ४१.९ टक्के मते मिळवून विजयी झाले होते.

जॉन्सन यांनी चार वर्षांपूर्वी सर्वांत जास्त मते मिळवून उच्चांक केला होता. त्यांपैकी २५ टक्के मते हंफ्रे यांनी या वेळी गमावली. निवडणुकीतील रिपब्लिकन उमेदवार बॅरी गोल्डवॉटर यांच्यापेक्षा निक्सन यांना ५ टक्के मते जास्त मिळाली. पण निक्सन या वेळी विजयी झाले असले तरी १९६० च्या निवडणुकीपेक्षा ६ टक्के मते त्यांना या वेळी कमी मिळाली आहेत.

लॉस अँजेलिस आणि टेक्ससचा अपवाद सोडला तर बहुतेक सर्व प्रमुख शहरांत निक्सन यांचा पराभव झाला. गौरवर्णियांची मते निक्सनना मिळाली, पण ९० टक्के निग्रोंनी त्यांच्याविरुद्ध मतदान केले. हंफ्रे यांना मिळालेल्या मतांत निग्रोंचा वाटा मोठा आहे.

दोन तुल्यबल पक्ष हे अमेरिकन लोकशाहीचे आतापर्यंतचे वैशिष्ट्य आहे. वॉलास यांची या वर्षाची उमेदवारी लक्षात घेता अमेरिकेत तिसरा प्रभावी पक्ष निर्माण होण्याची कितपत शक्यता आहे ? अशा तिसऱ्या पक्षाची उभारणी वॉलास करीत आहेत. १९७२ मध्ये अधिक मोठ्या प्रमाणावर लढत देण्याचा त्यांचा विचार आहे. प्रत्येक राज्यात त्यांनी पक्षकेंद्र उभारले आहे. तिसरा पक्ष उभारण्याचे प्रयत्न यापूर्वीही झाले, पण त्या बाबतीत वॉलास यांच्याएवढे यश आतापर्यंत कोणासही आले नव्हते. वॉलास यांनी या वेळी १४ टक्के मते मिळविली. एवढी मतेही आतापर्यंत तिसऱ्या पक्षाच्या कोणाही उमेदवाराने मिळविली नव्हती. पुढची निवडणूक वॉलास जिंकतील असे नाही; पण निवडणूक जिंकण्यासाठी आवश्यक असलेली २७० इलेक्टोरल व्होटस कोणत्याच उमेदवारास न मिळाल्यास अध्यक्षांची निवड करण्याचे काम अमेरिकन घटनेप्रमाणे प्रतिनिधिगृहावर सोपविले जाते. यंदाच तशी परिस्थिती निर्माण होईल असे वाटले होते. तो धोका या वर्षी टळला असला तरी वॉलास यांच्या निग्रोद्वेष्ट्या पक्षाचे बळ वाढल्यास पुढच्या निवडणुकीत या धोक्याची शक्यता अधिक आहे. अध्यक्षांची निवड अखेर प्रतिनिधिगृहच करणार असेल, तर मग अध्यक्षीय निवडणुकीतील मतदानाला फारसा अर्थ राहणार नाही. यासाठी निवडणूक कायद्यात दुरुस्ती करण्याचा विचार घटनातज्ज्ञ करीत आहेत.

अध्यक्ष एका पक्षाचा आणि काँग्रेसची दोन्ही सभागृहे प्रतिस्पर्धी पक्षाची असा प्रसंग अमेरिकेच्या इतिहासात १८९२ नंतर गेल्या ७६ वर्षांत यंदा प्रथमच आला आहे.

अध्यक्षीय निवडणुकीवर दर वेळेस वाढत्या प्रमाणावर खर्च केला जात आहे. १९६० साली १७॥ कोटी डॉलर, १९६४ साली २० कोटी डॉलर आणि १९६८ साली २५ कोटी डॉलर खर्च झाला. यंदाच्या (खर्चाचे नक्की आकडे हाती येण्यास वेळ


**शिलंगणाचे सोने**

ब. मो. पुरंदरे

आवृत्ती समाप्त

लागेल; पण वरील अंदाज सिटिझन्स रिसर्च फौंडेशनचा आहे.) टेलिव्हिजनचा— विशेषत: रंगीत टेलिव्हिजन कार्यक्रमांचा—अधिक उपयोग केल्याने हा खर्च वाढत आहे. टेलिव्हिजन कार्यक्रमांवर चार वर्षांपूर्वी ३ कोटी ६० लाख डॉलर खर्च झाला या वर्षी तो ५ कोटी डॉलरपर्यंत वाढला.

अध्यक्षीय निवडणुकीची उमेदवारी मिळविण्यासाठीसुद्धा या वर्षी बराच खर्च करण्यात आला. निक्सन व रॉकफेलर यांनी प्रत्येकी ५० लाख डॉलर खर्च केला. हंफ्रे प्राथमिक निवडणुकीत उतरले नव्हते, पण उमेदवारी मिळविण्यापूर्वी त्यांनी ३० लाख ते ४० लाख डॉलर खर्च केला. रॉबर्ट केनेडींनी ४० लाख ते ५० लाख डॉलर व मॅकार्थींनी ६० लाख ते ७० लाख डॉलर खर्च केले. निवडणूक खर्चा-संबंधीच्या कायद्यातील एक उणीव म्हणजे प्राथमिक मोहिमेवर किती खर्च करावा यावर कोणतेही नियंत्रण त्यात घातलेले नाही.

१९६४ चा अपवाद सोडला तर रिपब्लिकन पक्ष निवडणुकीवर नेहमीच अधिक खर्च करीत आलेला आहे. निक्सन यांनी या वर्षी १ कोटी ७० लाख डॉलर खर्च केल्याची बातमी आहे. हंफ्रे यांनी १ कोटी २० लाख डॉलर खर्च केले. त्यांपैकी ४० लाख डॉलर परतफेडीचे कर्ज आहे. तिसरे उमेदवार वॉलास यांनी ५८ लाख डॉलर खर्च केला.

निक्सन यांनी निवडणुकीपूर्वी व नंतर दिलेल्या मुलाखती व भाषणांवरून आशियापेक्षा युरोपच्या राजकारणाकडे ते अधिक लक्ष देणार असे दिसते. तिसऱ्या युद्धाचा धोका त्यांना अतिपूर्वेपेक्षा मध्यपूर्वेत अधिक वाटतो. परराष्ट्रांना आर्थिक मदतीचे प्रमाण कमी होण्याचा संभव आहे. जॉन्सन यांच्या कारकीर्दीत अध्यक्ष आणि कॉंग्रेस एकाच पक्षाचे असतानासुद्धा जॉन्सन यांनी सुचविलेल्या परराष्ट्रीय मदतीच्या रकमेत कॉंग्रेसने कपात केली. निक्सन यांच्या कारकीर्दीतही कॉंग्रेसमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाचेच बहुमत असल्याने हीच प्रवृत्ती चालू राहील.

बहुसंख्य निग्रोंची मते निक्सन यांना मिळालेली नाहीत. त्यांचा विश्वास संपादन करण्याचे अवघड कार्य निक्सन यांना करावे लागेल. निग्रोंना समानतेचे हक्क व संधी देण्याचा कार्यक्रम केनेडी व जॉन्सन यांनी सुरू केला तो त्यांना पुढे चालू ठेवावा लागेल. त्यांनी तो आखडता घेतल्यास किंवा त्याची उपेक्षा केल्यास निग्रोंचा असंतोष वाढेल.

भारताच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा प्रश्न अमेरिकेची आर्थिक मदत आपणांस पूर्वीसारखी मिळत राहील की कमी होईल हा आहे. ती कमी होण्याचा संभव आहे. निदान अधिक अटी लादल्या जाण्याची शक्यता आहे. भारताच्या अंतिम हिताच्या दृष्टीने हे एका अर्थाने फायद्याचे होईल; कारण त्यामुळे तरी भारताला स्वत:च्या पायांवर उभे राहण्याच्या दृष्टीने हालचाल करावी लागेल.

○

"सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

## नाझी भस्मासुराचा
## उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

त्या रात्री अद्याप आठवतात.

प्रकृतीच्या कारणाने बापूंनी आपल्याला त्या ज्येष्ठ अभिनेत्रीबरोबर पुण्याला धाडले होते. रोज रात्री ती आपल्याला तिच्या मुक्कामावर आग्रहाने ठेवून घ्यायची. तोवर तिच्या स्वरात माया असायची. रात्र चढू लागली की तिचे एक वेगळेच दर्शन आपल्याला घडू लागायचे. स्वत:लाच ती अनावर होते आहे असे वाटायचे. तिच्या नजरेत एक निराळीच चमक यायची. स्वर तापायचा. सिग्रेटींमधून सिग्रेटी ओढीत ती आपल्याला तिच्या मुक्त लैंगिक जीवनाच्या हकीकती सांग लागायची. मग मद्य बाहेर निघायचे. त्याचे घोट घेत ती आपल्याला पटवू पाहायची की हेच जीवन आहे. यात मौज आहे. आणि नाही तरी हे सर्व केल्या-

**विजय तेंडुलकर**

## लेखांक तीन

विना चित्रपटसृष्टीत नटीला पुढे येता येत नाहीच. मग हे सर्व करायचेच तर नाखुषीने, संकोचत अवघडत कशाला ? तिचे ते नि:संकोचपणे आपल्यापुढे ओकले जात असलेले लैंगिक किस्से ऐकताना अंगावर शहारे यायचे, मनस्वी त्रास व्हायचा. हे पाहून ती म्हणायची, मद्य घे म्हणजे बरी राहशील. अशी सोवळी राहून कशी जगशील ?

आपले संस्कार वेगळे. वय विशीचे. असे काही कधीच आपण ऐकले नव्हते, पाहिले तर नव्हतेच. पुन्हा यातून पळू म्हणावे तर बापूंचा धाक ! ब्रह्मांड आठवायचे. भयाने गळाठलेल्या थरथरत्या आपल्याला पाहून ती विचित्र हसून म्हणे, मीही अशीच होते फार पूर्वी. पण मग मला कळले. पाहा, या धंद्यात इतक्या आल्या आणि गेल्या पण इतकेच वय झाले तरी मी टिकून आहे. शिवाय मी माझा जोडीदार ठरवते आणि बदलते. माझ्यावर कसलीही सक्ती नाही. माझा गैरफायदा घेण्याची कोणाची हिंमत नाही. मी स्वतंत्र आहे !

मध्येच ती ढसढसा रडू लागायची. मध्येच ती खदखदा हसू लागायची. रात्रभर

ती झोपू द्यायची नाही. अमूक कर, तमूक कर, म्हणून पिच्छा पुरवायची. त्या रात्री आपल्याला इतक्या भयावह आणि नकोशा वाटस्या की पुण्यातल्या आपल्या बहिणीकडे आपण जाऊन जास्तीत जास्त वेळ बसू लागलो आणि गयावया करून तिला सांगू लागलो, की मला तिच्याबरोबर जाऊ देऊ नकोस ! मला लपव, अडवून ठेव. काय वाटेल ते कर, पण मला तिच्याबरोबर नाही जायचे ! आपल्या अंगाला त्या रात्रींच्या स्मरणानेही नंतर कित्येक दिवस कापरे भरायचे, जीव गोळा व्हायचा.

सुदैवाने त्या काळरात्रीतून आपण सहीसलामत सुटलो. पुढे त्या नटीच्या मायाजालातूनही बाहेर यायला मिळाले. बापूंनाच असे आढळून आले, की एक मराठी कलावंत म्हणून उषाला पुढे आणण्याच्या मिषाने ही बाई पडत्या मोबदल्यात तिचे

**दोष तिचा नसेलही ! तिला तरी असे कोणीतरी बनवलेच असेल. यशाच्या अवघड मार्गानेच तिला यावे लागले असेल. आपण जगतो तो आपल्यापुरता जगण्याचा नियम होतो. पुष्कळदा आयुष्य माणसाला घडवते.**

....................

करार निर्मात्यांशी करून देऊन मधल्या मध्ये आपला फायदा करून घेते !

तरीही एक खरे की अभिनेत्री म्हणून ती अतिशय गुणी आणि ताकदीचीच होती. तिच्यापासून लांब गल्याने आपला तिच्याविषयीचा एवढा आदर तरी कायम राहिला.

दोष तिचा नसेलही ! तिला तरी असे कोणीतरी बनवलेच असेल. यशाच्या अवघड मार्गानेच तिला यावे लागले असेल. आपण जगतो तो आपल्यापुरता जगण्याचा नियम होतो आणि तोच तेवढा खरा वाटतो. पुष्कळदा आयुष्य माणसाला घडवते. अर्थात माणसाकडे मुळात काय असते त्याचाही भाग यात असेलच. तिच्याकडे एका मागासलेल्या, असंस्कृत, अशिक्षित घरातल्या जन्माचे आणि रांगड्या, स्त्रीकडे केवळ भोगवस्तू म्हणून पाहणाऱ्या वातावरणातल्या संस्कारांचे संचित होते. शरीर देऊन तिला प्रत्येक गोष्ट मिळवावी लागली. तिच्यापुरते तेच यशाचे गणित बनले, जगण्याची गोळाबेरीज ठरली. शरीर देणे भाग पडणारी ती मग ते खुषीने आणि स्वैरपणे देऊ लागली आणि यशाचा, स्वास्थ्याचा टप्पा गाठून होताच जणू एका

सूडभावनेने पुरुषाचे शरीर घेऊ लागली, त्याची निवड स्वत: करू लागली, असे वेगवेगळ्या वयाचे दहा–पाच पुरुष ' बाळगू ' लागली. तिच्या लेखी यशाची हीच एकच एक खूण असेल.

आपल्याला ते सारेच नवे, थरकाप उडवणारे, अतोनात कोंडमारा करणारे आणि फार फार त्रासदायक ठरले. तो अनुभव आयुष्यात कधीही विसरला जाण्यासारखा नाही.

चहा घेऊन, उषा खेर सांगते ते वरपांगी तरी लक्षपूर्वक ऐकून, तो वडीलधारा पुरुष आणि ती पोरसवदा तरुण मुलगी निघून जातात. जाताना तो वडीलधारा कृतज्ञतेच्या स्वरांत म्हणतो, तुमच्या सांगण्याचा पुष्कळच उपयोग होईल. तुम्ही फार चांगले सांगितलेत. आभार मानावेत तेवढे थोडेच.

ते गेल्यावर उषा तशीच बसून राहते आणि स्वतःशी म्हणते, मला सांगायचे होते ते मी सांगूच शकले नाही. सारे फार वरवरचे, औपचारिक झाले. मी जगले ते त्यांनी ऐकायला हवे होते. अनुभवांनी सगळे कळते ते खरे असते. उषा मराठे या उदयोन्मुख मध्यमवर्गीय ब्राह्मण मुलीने एकाकी अनुभविलेल्या पुण्यातल्या त्या अविस्मरणीय रात्री मी सांगायला हव्या होत्या. पण त्या एवढ्याशा सहवासात कशा सांगणार ? त्यांनाही बहुधा त्यांच्या मनातल्या आधीच तयार असलेल्या निष्कर्षांना पुष्टी देण्यापुरती उषाकिरणची गरज असावी. ती भागली. ते गेले. ते सारे अनुभव मात्र राहिले आहेत तसेच . . .

कोल्हापूरच्या स्टुडिओत शुटिंग चालू होते. आपण हिंदीतही नावारूपाला आल्यानंतरची ही हकीकत आहे. एका छोट्या भूमिकेसाठी कोणी तरी नवी मुलगी दिग्दर्शक शोधीत होते. भूमिका छोटीशीच होती पण या निमित्ताने पुढे येऊ शकेल, असा एखादा नवा चेहरा पडद्यावर आणता आला तर आणावा अशी दिग्दर्शकांची इच्छा होती. त्या भागात नाटकांतून कामे करू लागलेली एक तरुण गुणी मुलगी कोणाच्या तरी ओळखीने चाचणीसाठी स्टुडिओत आली. दिग्दर्शकांना ती भूमिकेला योग्य वाटली नाही. आपण त्यांना आग्रह केला, तसेच 'नाही' म्हटलेत तर तिला ते फार लागेल,

ती नाउमेद होईल. ती नवी आहे. तिची कॅमेऱ्यासमोर चाचणी घेऊन ती तिलाच दाखवा आणि नकार का देता आहात ते तिला पटवा. त्यांनी ऐकले. चाचणी घेतली. ती तिला दाखवून दिग्दर्शकांनी खुलासेवार सर्व सांगितले. जाताना ती आपल्याला भेटायला आली. फणकाऱ्याने ती म्हणाली, "उषाबाई, मला ठाऊक आहे मला का नकार मिळाला ते. त्या अमकीसारखी मी दिग्दर्शकाबरोबर झोपले नाही म्हणून मला नकार मिळाला. ते इथे करावे लागते!"

फणकाऱ्यानेच तोंड वळवून ती गेली. आपल्याला तिला अडवून पुष्कळ काही एकवायचे होते. तिला सांगायचे होते की, हे बघ, तू अगदी चुकीचा समज करून घेते आहेस–

तेव्हाही सारे सांगणे मनातल्या मनात राहिले. नंतर खूप लागून राहिले. या समजुतीने आपल्या कलाजीवनाला आरंभ करणाऱ्या त्या मुलीचे पुढे काय होईल? तसे ते झाले तर तो दोष कुणाचा?

खरेच; कुणाचा?

......'जशास तसे'च्याच सुमारास 'वासुदेव बळवंत' चेही शुटिंग चालू झाले होते. दिग्दर्शक होते विश्राम बेडेकर. भूमिका महत्त्वाची किंवा आव्हान वाटावे अशीच होती. पण बेडेकरांच्या हाताखाली काम करणे मात्र आव्हान ठरले. बेडेकरांची कामाची शिस्त कडक. ही ते स्वत: सांभाळीतच, असे नसले तरी नट-नटीला किंवा तंत्रज्ञाला यातून सुटका मिळत नसे. चूक घडल्यास बेडेकरांच्या रागाच्या एखाद्याच वाक्याची किंवा तुच्छतेच्या एखाद्याच कटाक्षाची शिक्षा मिळे ती चाबकाच्या फटकाऱ्यासारखी असे. बेडेकर नट-नटीला आपल्याला काय हवे ते स्वत: नेमके दाखवू शकत असत. ते कसे हवे हे ते समजावून सांगत. परंतु अनेकदा ते आपल्यासारख्या मर्यादित बौद्धिक व्यासंगाच्या मुलीला कळत नसे. आणि मग ते जमले नाही की, कपाळावर हात मारून कॅमेऱ्यामागे जाऊन बसलेल्या बेडेकरांच्या मुद्रेवर जे वैफल्य येई, जो उद्वेग दाटे तो पाहून संवेदनाक्षम कलावंताला नको जिणे होऊन जाई. बेडेकरांना हवे ते आपल्याला कधीही जमणार नाही असे त्याला वाटू लागे आणि बेडेकरांना हेच हवे असे. एवढे मिळाले की ते त्या लाचार, स्वत:ला क्षुद्रातिक्षुद्र समजणाऱ्या नटाकडून आपल्याला हवे तसे काम काढून घेत. समाधानाचा, खुषीचा शब्द आपण या एखाद्या पहाडासारख्या अनघड शरीराच्या बुद्धिमान माणसाच्या तोंडून कधी ऐकलाच नाही. बहुधा कुणीच तो कधीही ऐकला नसावा. बेडेकरांच्या अतिगंभीर मुद्रेवर हसू येई ते फक्त छद्मी. इतके असूनही अभिनयाचे–चित्रपटातल्या अभिनयाचे–धडे आपण प्रथम घेतले ते या माणसाकडून. चित्रपटतंत्रावर बेडेकरांची फार चांगली हुकमत होती.

हा चित्रपट सेटवर असतानाच अमिया चक्रवर्ती नावाच्या एका बंगाली दिग्दर्शकांना त्यांच्या हिन्दी चित्रासाठी नायिकेच्या भूमिकेसाठी नवा चेहरा हवा होता

असे बापूंना कळाले. त्यांनी तशी जाहिरात दिली होती. वसईचे आमच्या कुटुंबाच्या परिचयाचे धुरी म्हणून एक ध्वनिसंयोजक होते. त्यांनी बापूंना ही बातमी दिली. बापू या बातमीने एकदम फुलारले. आपण मात्र कोमेजलो. हिन्दी चित्रपटातले काम म्हटले की नको वाटे–कुठेतरी पळून जावे आणि लपून बसावे असे वाटे. मराठी-गुजरातीत बरी कामे करूनही हिन्दीत अद्याप कोणी आपला विचार करण्याला तयार नव्हते. जिथे तिथे नकार. हिन्दी चित्रपट काढणारे महाराष्ट्रीय दिग्दर्शकदेखील उषा त्या 'रोल'ला 'फिट्' नाही, तिला हिन्दी उच्चार चांगले जमणार नाहीत, असे म्हणून आपल्याला नापास करीत. एक आठवण तर अजून जखमेसारखी आत कुठे तरी चरते आहे.

मुंबईच्या एम. ॲण्ड टी. स्टुडिओत निघणाऱ्या एका हिन्दी चित्रपटात काम आहे असे कळले म्हणून बापू तिकडे आपल्याला घेऊन उत्साहाने पोचले. मराठीत आपल्याला चांगली कामे मिळत आहेत हे त्यांनी दिग्दर्शकांना सांगितले. त्याचा त्यांच्यावर काहीही परिणाम झाला नाही. एखादी एक्स्ट्रॉ मुलगी कोणी आणावी तसे ते आणि त्यांचे तंत्रज्ञ आपल्याकडे घाणेरड्या नजरांनी पाहत होते. बापूंनी सुचविले, टेस्ट घ्या. दिग्दर्शकांनी प्रथम हिन्दीचीच परीक्षा घेण्याचे ठरवले. दहापाच माणसे सर्कसमधले एखादे बंदिस्त जनावर न्याहळतात तसे आपल्याला न्याहाळीत भोवती बसली होती. आपल्या हाती एक हिन्दी चोपडे देण्यात आले. उभ्याने वाचायला सांगण्यात आले. बापू कुठे तरी अपेक्षेने उभे होते. आपण वाचू लागलो. पाच ओळी झाल्या, दहा झाल्या, परिच्छेद सरले, पान संपले, दोन पाने झाली, पाच झाली–आपण वाचत होतो. कोणी आपल्याला पुरे म्हणतच नव्हते. सारे जणू गंमत पाहत होते. आपल्याला डोळयांवाटे धारा लागल्या, शब्द आवंढयाबरोबर घशात अडू लागले तरी वाचन पुरे असे कोणी म्हणेना. आतून या अवहेलनेपोटच्या वांझ संतापाचे कढांवर कढ येऊ लागले. असे वाटत होते की, चोपडे त्या दिग्दर्शकाच्या तोंडावर मारून निघून जावे. मला हे समजले कोण ? करमणुकीसाठी आणलेले एक पोटार्थी साधन ? मला नको काम, नको काही–मला इथून निघून जायचे आहे !

पण हे शक्यच नव्हते.

बापूंना हे आवडले नसते.

ते जवळच कुठे तरी होते पण त्यांनादेखील उषाची दया येत नव्हती, तिच्याविषयीचा अभिमान उसळून उठत नव्हता. तो सारा तमाशा तेदेखील निमूट बघत होते–केवळ एकाच आशेने–आपली उषा हिंदी चित्रपटांची हिरॉइन होऊन जाईल आणि वैभव हात जोडून समोर उभे राहील.

पुन्हा आपण नापासच झालो. जे पाच ओळी ऐकून कळण्यासारखे होते ते पाच पाने वाचून घेऊन त्या घाणेरड्या, दुष्ट माणसांनी अखेर ठरविले, 'डिक्शन अच्छी

नहीं.' वर मराठी मुलींवर चार सराईत शितोडे.

अद्याप स्मरण झाले तर काळीज जळते. किती तरी दिवस त्या अनुभवांतून आपण बाहेर येत नव्हतो.

यात त्या बंगाली दिग्दर्शकाला हव्या असलेल्या नव्या चेहऱ्याची वर्दी बापूंकडे घुरींनी आणली. बापू एकदम उत्साहभराने ओसंडू लागले आणि आपल्या अंगाची तलखी सुरू झाली. मनाशी आपण स्वतःलाच रागारागाने बजावू लागलो, मी जाणार नाही! काय वाट्टेल ते झाले तरी मी मुळीच जाणार नाही! बापूंपुढे हे बोलण्याची अजून प्राज्ञा नव्हती. आता वाटते, समजा बोलतो तर ते काय करणार होते? कदाचित् त्यांनी काहीच केले नसते. पण तरी तेव्हा त्या माणसाची मनस्वी भीती आपल्याला वाटे. त्या भीतीपोटीच मुकाट्याने सजून बापूंमागून आपण चाचणीच्या नव्या तमाशाच्या तयारीने त्या बंगाली दिग्दर्शकापुढे पोहोचलो. नकाराची शंभर टक्के खात्री तर होतीच. जाहिराती देऊन होणाऱ्या निवडीत पुष्कळ पोरी आल्या असत्या. आपल्याहून रूपाने उजव्या, शिवाय उत्तर भारतीय म्हणून हिंदी उच्चारांत या लोकांना हव्यात तश्या. कोणी बंगाली नार येती तर दिग्दर्शक महाशयांचा 'प्रेफरन्स' तिला मिळणार हे तर एकूण बंगाली वृत्तीविषयीची प्रसिद्धी ऐकली होती



'हुस्नका चोर'
१९५१

त्यावरून स्वच्छच दिसत होते

नाखुषीने, रागाने, निरिच्छपणे आपण कशातरी चक्रवर्तींपुढे जाऊन उभ्या राहिलो. मनाशी म्हटले, कर मेल्या मला एकदाची नापास आणि संपव हा छळ !

शांत मुद्रेच्या त्या पस्तीस-छत्तिशीतल्या माणसाने आपल्याला एकदा आपाद-मस्तक न्याहाळले. ती नजर बारीक होती पण घाणेरडी नव्हती. ती नाउमेद करणारी, शरमिंदे करणारी नव्हती तर ती कमालीची सभ्य, सुसंस्कृत आणि उमेद वाटायला लावणारी होती. तरीही आपला निरिच्छपणा, राग, बेफिकिरी पोटात होतीच.

चक्रवर्तींनी असे एकदा नीट पाहून मंद हसत हिंदीत विचारले, "तुमचे नाव काय ? "

" उषा बाळकृष्ण मराठे. "

" तुमची उंची सांगता ? "

" पाच फूट दोन इंच. "

" हिंदी येते का ? "

पोटातला राग एकदम जागा झाला. ती चाचणी नको नि काहीच नको असे वाटून आपण सवयीने नि पूर्ण बेफिकिरीने म्हटले "च्यक् ! "

चक्रवर्तींची नजर आपल्या या आविर्भावावर किंचित्काळ रेंगाळली. ते वळले. चाचणी न घेण्याचे त्यांनी ठरवले असावे. आपण मनाशी म्हटले, बरे झाले. आता एकदाच्या इथून बापूंमागून बाहेर पडलो की सुटलो. पुन्हा या माणसाचे तोंड पाहण्याचा प्रसंगच नाही.

पण काय आश्चर्य !

चकवर्तींनी हिरॉईनच्या कामासाठी आपल्याला निवडले ! कोणत्याही चाचणी-शिवाय, हेलपाट्यांशिवाय, अवहेलनेशिवाय, ओठ दाबून सोसण्याच्या कोंडमाऱ्या-शिवाय ! आपल्याला हिंदी येत नाही हे कळूनही ! साधी कॅमेरा टेस्टदेखील न घेता ! बापूंना ते म्हणाले, तुमच्या उषाला माझ्या ' गौना ' चित्रपटात हिरॉईन करण्याचे मी ठरवले आहे. पुढचा व्यवहार ठरवण्यासाठी जरा थांबा.

बापूंना अस्मान ठेंगणे वाटले ! एक उंच उडी मारण्याचे काय ते त्यांनी बाकी ठेवले.

आपले नवल काही केल्या ओसरत नव्हते. इतक्या झटपट, कोणत्याही तमाशा-विना सारे संपले ? आणि आपण निवडल्या गेलो ? ज्यासाठी अभिनेत्री वर्षानुवर्षे जीव पाखडतात आणि तरीही जे अप्राप्यच राहते ते आपल्याला हे असे एका क्षणात मिळाले ? आनंदभराने त्याहूनही अमिया चक्रवर्ती नामक त्या स्निग्ध, सभ्य नज-रेच्या स्मितमुखी माणसाविषयीच्या कृतज्ञतेने आपले काळीज शिगोशिग भरले.

हा अनुभव बाळपणापासून कधीही न लाभलेला, विलक्षण होता.

पुढे केव्हातरी चक्रवर्तींनी या निवडीचा खुलासा केला. तोदेखील मजेचा होता. ते म्हणाले, "उषा, मी तुला त्या भूमिकेसाठी निवडले ते केवळ ते तुझे बेफिकीर सरळ वृत्तीचे 'च्यक्' ऐकून! नकाराचा हा अनौपचारिक, घरेलू मराठी प्रकार मला नवा होता आणि मला तुझ्या तोंडी तो इतका आवडला, की त्या क्षणी मला तू माझ्या चित्रपटाची हिरॉईन म्हणूनच दिसलीस!

सौ. उषा खेर जुने अल्बम चाळीत पुटपुटते, काय एकेक योगायोग असतात, नाही? ऋणानुबंधदेखील कुठून येतात, कुठे जातात कुणास ठाऊक, पण ते आधीच जणू कुणी तरी ठरवून ठेवत असावे.

[क्रमशः]


पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २



# परकीय मदत व स्वावलंबन

गेली १५ वर्षे आर्थिक विकासासाठी राष्ट्रीय पातळीवरून योजनापूर्वक प्रयत्न करूनही आपली अर्थव्यवस्था सध्या अत्यंत बिकट व ओढग्रस्त अशा अवस्थेत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारातील परत-फेडी (बॅलन्स ऑफ पेमेंटस्) बाबतची परिस्थिती अत्यंत कठीण असून, चलन-फुगवटचामुळे वेतन व किमती इतक्या वर चढल्या आहेत, की त्यामुळे आर्थिक वाढीचा मार्ग जवळजवळ बंदच झाला आहे. गेली कित्येक वर्षे हे वाढीचे प्रमाण कमीकमीच होत चालले आहे. पूर्व युरोपातील देशांकडून वाघिणी व इतर इंजिनीअरिंगविषयक मालाच्या मागण्या मिळूनही, इंजिनीअरिंग उद्योगात सध्या पिछेहाटच चालू आहे. देशातील बहुसंख्य जनता ही आपल्या अन्नविषयक गरजा भागविण्यासाठी अमेरिकेच्या पी. एल. ४८० कार्यक्रमाच्या औदार्यावरच अवलंबून आहे. निम-प्रक्रिया केलेला माल व मध्यस्थ वस्तू ( इंटर मीजिएटस्) यांच्या तुटवडचामुळे आपले उद्योगधंदेही आता प्रकल्पाव्यतिरिक्त

**प्राचार्य व्ही. वाय. कोल्हटकर**

**प्रा. के. एन. राज**
**व**
**डॉ. वि. म. दांडेकर**
**यांनी यापूर्वी ' माणूस ' मधून**
**या विषयाची**
**वेगवेगळ्या दृष्टिकोणातून केलेली चर्चा**
**वाचकांच्या स्मरणात असेलच.**

---

होणाऱ्या इतर मदतीवरच विसंबून आहेत. चहा व ताग ही परकीय चलन मिळविण्याची जी आपली सर्वांत मोठी साधने त्यांच्या उत्पादनात व निर्यातीत परकीय भांडवल मोठ्या प्रमाणावर गुंतलेले असून, या भांडवलाचे त्यावरील नियंत्रणही मोठे आहे. पेट्रोलियम रिफायनरीज, खाणी, मळे, रासायनिक उद्योग व इतर अनेक उपभोग्य वस्तूंच्या किफायतशीर ठरणाऱ्या उद्योगांमध्ये परकीय मक्तेदारी भांडवल गुंतलेले आहे. **आपल्या औद्योगिक रचनेचा फार मोठा भाग परकीय भांडवलाच्या नियंत्रणाखाली आहे.**

परकी सरकारे व संस्था यांच्याकडून आपण घेतलेले एकूण कर्ज (परतफेडीचा एकूण हिशेब जमेस धरून) सुमारे ५४१३ कोटी रुपये असावे असा अंदाज करण्यात आलेला असून, पी. एल. ४८० कार्यक्रमानुसार खरेदी केलेल्या अन्नधान्याच्या विक्रीमुळे जी रक्कम उभी राहते त्यांतून अमेरिकेकडून घेतलेल्या १०२६ कोटी रुपयांच्या, रुपयांचे स्वरूपांतील कर्जाचाही त्यात समावेश आहे. या देशातील बडे व्यापारी, उद्योगपती व नौकरशहा यांना परदेशी खाजगी भांडवलदारांशी तांत्रिक व आर्थिक सहयोगाचे संधान बांधण्याचे वेड लागले असून त्यामुळे या देशात आतापर्यंत एक हजार कोटी रुपयांचे परकीय खाजगी भांडवल आले आहे. शेजारी राष्ट्रांशी नेहमीच तणातणीचे वातावरण राहिल्यामुळे वार्षिक संरक्षणाच्या खर्चाचा प्रचंड बोजा आपणावर कोसळला असून, तुटीच्या अर्थभरण्यामुळे, चलन फुगवट्यामुळे येणाऱ्या सर्व आपत्तींचा अनिर्बंध संचार सुरू झाला आहे.

जागतिक भांडवलशाहीला जे संकट भेडसावीत आहे त्यामुळे तर आपली आर्थिक परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची झाली आहे. पौंड व सर्वशक्तिमान डॉलर या जगातील दोन मजबूत चलनांची परिस्थितीही या आगामी संकटामुळे मोठी अडचणीची बनली आहे. रुपयाच्या अवमूल्यनानंतर काही काळातच पौण्डाचे अवमूल्यन

करावे लागले असून, त्याच वेळी इतर अनेक चलनांचे अवमूल्यन घडून आले आहे. युरोपातील सोन्याच्या बाजारात खरेदीदारांनी मोठी झुंबड केल्यामुळे डॉलरलाही मोठ्या संकटाला तोंड देण्याचा प्रसंग आला होता. साम्राज्यवाद्यांमधील अंतर्गत संघर्ष; आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका या खंडांतील राष्ट्रीय विमोचना-चनासाठी झगडणाऱ्या स्वातंत्र्यवाद्यांचा साम्राजशाही सत्तेशी चालू असणारा संघर्ष; आणि मंदी व आर्थिक संकट यांना तोंड देण्यासाठी किन्स यांनी सुच-विलेल्या चलन व जकातविषयक उपाययोजनांची कठोरपणे केलेली अंमलबजावणी यांमुळे भांडवली जग आता एका अत्यंत अनागोंदी स्वरूपाच्या विकट संकटाच्या-काठावर उभे आहे. बहुतेक प्रगत राष्ट्रे या बिकट परिस्थितीला तोंड देण्यासाठी आता किन्सपूर्वकाळातील पद्धतीकडे परत जात आहेत.


भारतीय नियोजन मंडळाने प्रसिद्ध केलेल्या चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या मार्ग-सूचक प्रबंधात (अप्रोच पेपर) अत्यंत हातघाईला आलेली अंतर्गत परिस्थिती अथवा जगातील भांडवलशाही क्षितिजावर जमत असलेले संकटाचे ढग यांचा कोठ-लाही उल्लेख करण्यात आलेला दिसत नाही.

धोरणे ठरविण्यासाठी मार्गदर्शक ठरतील अशा कोठल्याही विचार करण्यासारख्या सूचना अर्थातच् या प्रबंधामध्ये नाहीत. या प्रबंधात एकच गोष्ट सूचित करण्यात आली आहे व ती म्हणजे परकीय मदतीच्या द्वारा होणारी वाढ ही निकोप ठरत नाही. सबब चौथ्या योजनेच्या पाच वर्षांच्या कालावधीत परकीय मदत, व्याज-भरणा व कर्जफेड यात सध्याच्या मानाने निदान ५० टक्के तरी कपात घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात यावा. निर्यातीत वाढ व आयातीत कपात करण्याचा प्रयत्न व्हावयास पाहिजे असेही त्यात सुचविण्यात आलेले आहे. आयात–निर्यात व्यापारामध्ये जी तफावत निर्माण होते ती केवळ भांडवली स्वरूपाच्या मालाच्या बेसुमार आयातीमुळेच होत असून, चलनफुगवटयामुळे निर्माण झालेली अंतर्गत परिस्थितीही त्याला कारणीभूत असते या गोष्टीची त्यात दखलही घेण्यात आलेली नाही.

पुढील विभागात प्रथम आयातनिर्गत व्यापारातील तुटीची भरपाई या प्रश्नाचा विचार करून मग त्याच्यापुढील विभागामध्ये धोरणविषयक प्रश्नाचा आपण क्रम-वार विचार करणार आहोत.

## आयात–निर्यात व्यापारातील तूट

आयात कमी करणे व प्रत्यक्ष परकीय मदतीची पातळी खाली आणणे अत्यंत कठीण काम आहे ही गोष्ट या 'अप्रोच पेपर' मध्ये (मार्गसूचक प्रबंधात) मान्य करण्यात आली आहे. चौथ्या पंचवर्षीय योजनेच्या मसुद्याच्या आधारावरच चौथ्या पंचवर्षीय योजनेच्या काळात आयात व निर्यात व्यापाराचा एकूण हिशेब करण्यात



औद्योगिक रचनचा मोठा भाग परकीय
भांडवलाच्या नियंत्रणाखाली आहे.

आलेला असून, त्या आधारेच पुढील काही वर्षांत आयात–निर्यात व्यापारातील तफावतीचे प्रमाण किती असेल त्याचा अंदाज करण्यात यावयाचा आहे. ' नियोजनाला सुटी 'च्या दोन वर्षांच्या खंडित कालात एकंदर परिस्थितीत फारसा जाणवण्यासारखा फरक पडलेला नाही, असे गृहीत धरण्यात यावयाचे आहे. परदेशांकडून आपण घेतलेल्या कर्जांत जशी वाढ झाली आहे तसेच परदेशांतून चुकत्या करावयाच्या बाक्यांमध्येही त्याचप्रमाणे वाढ झाली आहे.

अवमूल्यनोत्तर काळातील रुपयाच्या अधिकृत किंमतींच्या आधारे योजनेच्या मसुद्यात असा अंदाज करण्यात आलेला आहे की, व्याज व मुद्दलाची फेड यांसाठी या पाच वर्षांच्या काळात एकूण २२८४ कोटी रुपयांची मागणी पुरी करावी लागणार आहे. आणि आतापर्यंत ही रकम २३०० कोटी रुपयांपर्यंत सहज वाढली असेल; कारण गेल्या दोन वर्षांत आपण परदेशी देणी नवी कर्जे उभारूनच निवारली आहेत. याचा अर्थ असा की आपणांला प्रतिवर्षी ४६० कोटी रुपयांची परतफेड करावी लागणार आहे. खाजगी कारखानदारीच्या क्षेत्रामध्ये ज्या कारखान्यांमध्ये खाजगी परकी भांडवल काही प्रमाणांत गुंतविले गेलेले आहे त्यामुळे नफे, रॉयल्टीज, फी आणि भांडवल या स्वरूपात जी कमाई त्यावर होते ती पण परदेशांकडे रवाना व्हावयाची असल्यामुळे, या रकमेचाही वरील रकमेत अंतर्भाव करावयास हवा. भारतीय उद्योगधंद्यांमध्ये परकीय खाजगी भांडवलाची एकूण गुंतवणूक आता १००० कोटी रुपयांच्या आसपास पोचली असावी. त्यामुळे परकीयांना नफा, रॉयल्टीज इत्यादी स्वरूपांत जी रक्कम प्रतिवर्षी द्यावी लागणार आहे ती १०० ते १२० कोटी रुपयांपर्यंत जावयाची आहे. याशिवाय नागरी वस्तीची अन्नधान्याची गरज व अन्नधान्य उत्पादक आपली गरज भागवून उरलेले जे धान्य बाजा-

रात विक्रीसाठी आणतात ते धान्य, यांमधील गरजेनुसार निर्माण होणारी तूट भरून काढण्याकरिता जी अन्नधान्याची प्रतिवर्षी आयात करावी लागणार आहे, त्यासाठी लागणारा खर्च वेगळाच हिशेबात घ्यावयास हवा. शेतमालाच्या पिकाच्या दृष्टीने १९६७–६८ हे वर्ष चांगले ठरले ही गोष्ट खरी आहे. १९६८–६९ सालही चांगले जाईल असे दिसते. **परंतु जेथपर्यंत अमेरिकेचे आयात केलेले धान्य विकून रुपयाच्या स्वरूपात नवे भांडवल उभारणीची सोय निर्माण करण्याचा मोह दिल्ली सरकारला आवरत नाही आणि जोपर्यंत आगामी काही वर्षांमध्ये अन्नधान्य निर्मितीची काही विश्वासार्ह लक्ष्ये ठरली जात नाहीत तेथपर्यंत अन्नधान्याची आयात चालूच राहणार आहे.** यासाठी दरवर्षी आपणांला परदेशांना २५० कोटी रुपये तरी द्यावे लागतील असा अंदाज करावयास काहीच हरकत दिसत नाही. (रुपयाच्या अवमूल्यनानंतर अन्नधान्याची किंमत डॉलरच्या रूपाने द्यावी लागेल अशी समज अमेरिकन सरकारने आपणांस दिली आहे.) सेमी–प्रोसेसड् व इंटरमिजीएट्स (अंशतः प्रकिया केलेला व मध्यंतर अवस्थेत वापरावयाचा) स्वरूपाचा माल आयात करून त्यावर चालणाऱ्या उद्योगधंद्याची गरजही आपणांला भागवावी लागणार आहे. त्यांना ' मेन्टेनन्स इंपोर्टस् ' (उद्योग चालू राहण्यासाठी आवश्यक स्वरूपाचा माल) असे म्हटले जाते. या ' मेन्टेनन्स इंपोर्ट 'स् मध्ये पोलाद, खते, रॉकेल, न्यूजप्रिंट (वर्तमानपत्रांना लागणारा कागद), अलोहमिश्रित धातू (नॉनफेरस मेटल्स) इत्यादी बाबींचा समावेश असतो. चौथ्या पंचवर्षीय योजनेच्या काळातील पाची वर्षांत प्रतिवर्षी अशा स्वरूपाचा १६३८ कोटी रुपयांचा माल आयात करावा लागेल, असा अंदाज चौथ्या योजनेच्या मसुद्यात करण्यात आला आहे.

नव्या प्रकल्पांसाठी जी आयात करावी लागेल त्यासाठी जो पैसा परदेशी पाठवावा लागेल त्याचा मी या एकूण देण्यामध्ये समावेश केलेला नाही. परंतु त्याचा समावेश न करताही प्रतिवर्षी द्यावी लागणारी रक्कम २३६८ कोटी रुपयांपर्यंत वाढणार आहे.


निर्यात व्यापाराबाबत विचार करावयाचा तर असे दिसते की, अगदी अनुकूल परिस्थितीतही चौथ्या योजनेच्या पाच वर्षांच्या कालावधीत प्रतिवर्षी होणाऱ्या आयातीची किंमत १६०६ कोटी रुपयांपेक्षा जास्त असणार नाही अशी अपेक्षा चौथ्या योजनेच्या मसुद्यात व्यक्त करण्यात आली आहे. अवमूल्यनानंतरच्या पहिल्याच वर्षात निर्यात व्यापाराची एकूण किंमत १०८४ कोटी रुपयांपर्यंत वाढली. परंतु १९६७–६८ सालातील निर्यातीचे प्रमाण मात्र निराशाजनक असल्याचे वृत्त आहे. आणि विकट जागतिक परिस्थितीच्या संदर्भात विचार करता आपल्या निर्यातीमध्ये फारशी वाढ होईल अशी आशा करण्याचे मुळीच कारण दिसत नाही. पूर्व युरोप व इतर देशांकडून आपणांला पुष्कळ मागण्या मिळणाऱ्या असल्या तरी आपली निर्यात १२०० ते १३०० कोटी रुपयांच्या वर जाण्याची फारशी शक्यता

दिसत नाही. याचा अर्थ असा की आपल्या आयात व निर्यात व्यापारातील तफावत प्रतिवर्षी १००० ते ११०० कोटी रुपयांच्या घरात राहील. आपल्या निर्यातीमधून उद्योगधंदे चालू ठेवण्यासाठी जो माल आयात करणे आवश्यकच असते त्याचा खर्चही भागणार नाही. मग कर्जफड भरणा व अन्नधान्याची गरज यांसाठी लागणाऱ्या रकमेची तरतूद होण्याची गोष्ट तर बाजूलाच राहिली. आपल्या व्यापारी मालाच्या आयातीवर १९६७–६८ साली १९०० कोटी रुपये खर्च करावा लागणार आहे, त्यात कर्जफेडीसाठी द्यावयाची एकूण रक्कम मिळवावयाला हवी. आयात करावयाच्या आपल्या पुष्कळशा बाबी कमजास्त करण्यासारख्या नाहीत व त्यामुळे त्यात फार मोठ्या रकमेची कपात करण्यासारखी परिस्थिती नाही.

जुनी कर्जे व व्याजभरणा यांची निकड भागविण्यासाठी सध्या नवी कर्जे उभारण्याचा पर्यायी मार्ग अवलंबिला जात आहे. परंतु अशा तऱ्हेची स्थगिती अमर्याद कालपर्यंत काही चालू शकणार नाही. शिवाय, सरकारी पातळीवरून मिळणाऱ्या परकीय मदतीच्या स्वरूपात फार मोठ्या प्रमाणावर व झपाट्याने घट होत चालली आहे. त्यामुळे काळ जसा लोटत जाईल तशी आयात-निर्यात व्यापारातील तुटीमुळे निर्माण होणारी परिस्थिती अधिकच विकट होत जाईल. तेव्हा पुढील काळातील संभाव्य घडामोडींचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोणांतून फेरविचार व नव्या मार्गांचा शोधही ही आपली आता अत्यंत तातडीची अशी गरज आहे.

## परकीय मदत–कर्जे

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण अमेरिका, ब्रिटन, पश्चिम जर्मनी, रशिया इत्यादी राष्ट्रांकडून मदत मागण्यास व स्वीकारण्यास सुरुवात केली. आपण आय. बी. आर. डी. आणि आय. डी. ए. या दोन अमेरिकन वर्चस्वाखालील संघटनांकडूनही कर्जे घ्यावयास लागलो. आपणांला मिळालेल्या एकूण ५४१३ कोटी रुपयांच्या आर्थिक साहाय्यामधील ७० टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम अमेरिका व या दोन संघटनांकडून आपणांस मिळालेली आहे. आपणांला मिळालेल्या एकूण आर्थिक साहाय्यापैकी बहुतेक मदत ही विशिष्ट प्रकल्पासाठी म्हणून देण्यात आलेली असून, ज्या देशाकडून आर्थिक साहाय्य मिळाले असेल त्या देशातच या मदतीची रक्कम इतकी खरेदी करावयास हवी अशी या मदतीसाठी अट घालण्यात आलेली आहे. यावरून स्पष्टपणे दिसेल की, जे देश आपणांला आर्थिक मदत देत आहेत त्यांना आपला माल भारताला विकावयाचा असून आपल्या मालासाठी भारतामध्ये बाजारपेठ निर्माण करावयाची आहे. सरहद्दीच्या संरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर शस्त्रखरेदीकरिता जी रक्कम लागते त्या रकमेला व त्याशिवाय भांडवली स्वरूपाचा माल (यंत्रसामग्री वगैरे) व अर्धवट प्रक्रिया केलेल्या मध्यस्थ वस्तूंच्या खरेदीसाठी जी आर्थिक मदत मिळते त्यालाही वरीलप्रमाणेच रक्कम खर्चण्याबद्दलच्या अटी लागू आहेत. आर्थिक



आमच्या मदतीचा विनियोग आमचा माल घेण्यातच झाला पाहिजे.

मदत देणाऱ्या देशांकडूनच भारताने आवश्यक त्या मालाची खरेदी केली पाहिजे. यावरून पुढे खरेदी होणाऱ्या मालाच्या किमती चढ्या ठेवणे मदत देणाऱ्या देशाला सहजशक्य असते हे निराळे सांगावयास नकोच.

मिळालेल्या आर्थिक मदतीची तंत्रज्ञानविशारद उपलब्ध होण्याशी सांगड घालणे भागच पडते. सरकारी क्षेत्रात जे कारखाने उभारले जातात त्यांचे तांत्रिक व संघटनात्मक व्यवस्थापन बघण्यासाठी आर्थिक मदत देणाऱ्या देशांकडून आपणांला त्यांचे तज्ज्ञ येथे आणावे लागतात आणि कराराप्रमाणे आपल्या हाताखाली काम करणाऱ्या दुय्यम भारतीय तज्ज्ञांना व व्यवस्थापकांना शिकवून तयार केले पाहिजे अशी अट जरी करारानुसार या परदेशी सल्लागार व व्यवस्थापकांवर घातलेली असते तरी प्रत्यक्षात या विदेशी लोकांच्या हाताखाली काम करणाऱ्या भारतीयांना तंत्रज्ञान व व्यवस्थापन यांतील प्रावीण्य संपादन करण्याच्या बाबतीत त्यांचा काहीच फायदा होत नाही. प्रशिक्षणासाठी ज्यांना विदेशी पाठवण्यात येते त्यांनाही कोरड्या हातानेच परतावे लागते. (साम्यवादी राष्ट्रेच या गोष्टीला अपवाद म्हणून सांगता येतील) या सर्व गोष्टींचा एकंदर परिणाम असा झाला आहे की, सरकारी क्षेत्रात जे महत्त्वाच्या स्वरूपाचे उद्योग सुरू झाले आहेत त्यांत या देशातील लोकांना खालच्या श्रेणीतील कामधंदा मिळण्याची सोय एवढाच फायदा आपल्या दृष्टीने झालेला आहे. काही महत्त्वाचे अवजड उद्योगधंदे सुरू करण्यासाठी परदेशी मदतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. पण जेथपर्यंत हे उद्योग चालविण्यासाठी लागणारे तांत्रिक ज्ञान भारतीयांना होत नाही तेथपर्यंत भरमसाट पगार वा मोबदला देऊन विदेशी तंत्रज्ञ कामावर ठेवणे अपरिहार्य ठरत आहे. म्हणजे केवळ भारतामध्ये हा उद्योग सुरू झाला याव्यतिरिक्त आपणांला त्यापासून विशेष असा दुसरा काही लाभ झालेला नाही.

आपणांला मिळालेल्या एकूण परदेशी आर्थिक मदतीपैकी फार मोठा हिस्सा (जवळजवळ १५०० कोटी रुपये किंवा त्यापेक्षाही कदाचित जास्त) हा मदत

देणाऱ्या परदेशांकडून शस्त्रास्त्रे व इतर संरक्षणविषयक सामग्री खरेदी करण्यात खर्च झाला असून, या मदतीच्या रकमेपैकी आणखी एक मोठा भाग (७८० कोटी रुपये) हा मदतीच्या करारानुसार रेल्वेमार्ग, बंदरांची वाढ, मुलकी वाहतुकीसाठी विमान खरेदी, हायड्रो-इलेक्ट्रिक पॉवर प्रोजेक्टची उभारणी व शेतीविकास यांसाठी लागणाऱ्या गोष्टींच्या खरेदीवरच खर्च करणे भाग पडलेले आहे. प्रकल्पांसाठी म्हणून दिलेल्या या आर्थिक मदतीपैकी ७७ कोटी रुपये खाजगी क्षेत्रातील पोलादाच्या कारखान्यांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी खर्च करण्यात आले आहेत. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी आवश्यक (इन्फ्रा-स्ट्रक्चर) असा जो लोखंडी माल किंवा इतर जरूर लागणारी सामग्री (उदाहरणार्थ—रेल्वेची एंजिने व जेट विमाने) कर्ज देणाऱ्या देशांकडून किंवा आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटनांवर वर्चस्व असलेल्या देशांकडूनच खरेदी करण्यात आलेली आहे. मदतीच्या उरलेल्या रकमेपैकी फार मोठा भाग औद्योगिक विस्तारासाठी देण्यात आलेला असून, ही रक्कम कोणत्याही विशिष्ट प्रकल्पावर खर्च करावयाची नसून, जे उद्योगधंदे सध्या खाजगी क्षेत्रात चालू आहेत त्यांना आपले कारखाने चालविण्यासाठी अर्धवट प्रक्रिया केलेल्या वा पूर्ण प्रक्रिया केलेल्या मध्यस्थ वस्तू (भारी किंमत देऊन) खरेदी करता याव्यात म्हणून ही रक्कम खर्च करण्याची मुभा आहे.

**सरकारी कारखाने मागे सारून खाजगी कारखानदारी मजबूत करण्यासाठीच मदतीच्या रूपाने दबाव टकण्यात आलेला आहे असे म्हणता येईल.** शिवाय जी मदत देण्यात येत आहे ती अल्प प्रमाणात व हातचे राखून अवकाशाने दिली जात आहे. त्यामुळे ज्याला मदत मिळावयाची त्याला आपणांला किती मदत मिळणार आहे, ती केव्हा मिळू शकेल व त्यासाठी काय काय अटी मान्य कराव्या लागणार आहेत या बाबत नेहमीच संभ्रमात ठेवण्यात येत आहे. आणि मिळालेली मदत सहा महिन्यांच्या हप्तेवारीने जलदीने परत करावयाची असल्याने तर परतफेडीचे हप्ते व व्याजआकारणी पुरी करण्यासाठी मदत घेणाराला वारंवार दुसऱ्याकडून कर्जे काढावी लागत असून, त्यामुळे जसजसा काळ जाईल तसतशी मदतीच्या एकूण बोजात वाढ झालेलीच दिसून येत आहे. सोन्याच्या स्वरूपांत रुपयाची जी पूर्वी किंमत होती तिच्या ५७ टक्क्यांनी अवमूल्यन केल्यामुळे, बाकी राहिलेल्या कर्जाच्या रकमांमध्ये रुपयांच्या आकड्यांत खूपच वाढ झाली आहे. युद्धपूर्वकाळात ज्या बहुतांशी नागरी स्वरूपाच्या देशाचे अंकित राष्ट्र म्हणून आपण जखडलेले होतो, त्या देशाला निदान काही कच्च्या मालाची व ज्यात चढाओढ किफायतशीर होत नव्हती अशा काही औद्योगिक मालाची आपणापासून गरज होती. पण स्वातंत्र्योत्तर काळात तंत्रविषयक ज्ञानात जी क्रांती झाली त्यामुळे साम्राज्यवादी देशांची अशा तऱ्हेच्या मालाची गरज कमी झाली असून, काही बाबतींत तर आपल्याकडील मालाची त्यांना आता जरुरीच उरलेली नाही. काही धातूंच्याऐवजी प्लॅस्टिकचा वापर सुरू झाला असून, रबर, कापूस व ताग या भूमिजन्य मालाची

जागा सिंथेटिक्सने घेतली आहे. उलटपक्षी पोलाद, तांबे, जस्त, ॲल्युमिनिअम इत्यादी प्रकारच्या मालाचा वसाहतवादी देशांतील अंतर्गत ठिकाणामधून होणारा पुरवठा अपुरा पडत असल्यामुळे, या प्रकारचा माल अंकित देशांत निर्माण करून तो हस्तगत करणे वरील देशांना क्रमप्राप्त ठरते. प्राय: नागरी वस्ती असलेल्या साम्राज्यवादी देशांमध्ये तयार होणाऱ्या मालाला वसाहतींची बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते आणि वसाहतवादी देशांना औद्योगिक व संरक्षणविषयक गरजा भागविण्याच्या दृष्टीने ज्या धातू व दुर्लभ माल हवा असतो त्यावर आपले नियंत्रण प्रस्थापित करणे जरुरीचे ठरते. दुर्लभ धातू व माल यांचेवर कबजा मिळविण्यासाठी मदत योजना आणि परदेशी खाजगी भांडवलाची गुंतवणूक (आंतरराष्ट्रीय मक्तेदारांनी पुरविलेली व वापरलेली) या दोन्हींचाही वापर केला जातो. आणि या नियंत्रणांत विक्षेप येऊ नये म्हणून संबंधित देशांतून ही राष्ट्रे आपल्या संरक्षक पथकांचाही सर्रास वापर करतात. (उदाहरणार्थ, अमेरिकेची अशा प्रकारची लष्करी पथके जगातील ६४ देशांत आहेत व त्यांपैकी १९ लॅटिन अमेरिकेत असून, १३ युरोप खंडात आहेत.) अन्नधान्याच्या आणि पैशाच्या स्वरूपांत मदत करताना, अगदी मोक्याच्या वेळी या याचक देशांना अडचणीत गाठून त्यांना आपल्या परराष्ट्रीय आणि अंतर्गत धोरणात बदल करण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न अगदी पद्धतशीरपणे केले जातात.

**अमेरिकन सरकारजवळ रुपयाच्या स्वरूपात जो पुंजी साठली आहे तिचा निवडणुकांत हस्तक्षेप करण्यासाठी, विद्यापीठांवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी आणि राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांना व देशातील सुशिक्षित वर्गाला वश करून घेण्यासाठी उपयोग केला जातो असे मानण्यास भरपूर वाव आहे.**

यंत्राचे सुटे भाग भरमसाट किंमतींना विकून आणि अत्यंत महत्त्वाची तांत्रिक माहिती न पुरवून दुसऱ्या देशांवर आपला राजकीय व आर्थिक दबाव टाकण्याचे अशाच तऱ्हेचे तंत्र रशियनांनीही वापरण्यास सुरुवात केली आहे, ही गोष्ट खेदपूर्वक नमूद करावयास हवी.

## विदेशी खाजगी भांडवल

आपल्या देशात विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांमध्ये १००० कोटी रुपयांच्या वर विदेशी खाजगी भांडवल गुंतविलेले आहे, या गोष्टीचा निर्देश पूर्वी करण्यात आलेलाच आहे. सरकारी उद्योगांच्या क्षेत्रांत जे डावपेच केले जातात, त्याव्यतिरिक्त आणखी काही प्रकारच्या हिकमती खाजगी मक्तेदारी भांडवलाला खाजगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांमध्ये लढवावयाच्या असतात. पहिली गोष्ट अशी की, जे भांडवल भारतात येऊ पाहत असते, ते भांडवल प्रचंड औद्योगिक मक्तेदारांचे भांडवल असते. त्यांच्या जगभर ज्या उलाढाली चालू असतात, त्यांच्याशी तुलना करता त्यांची

भारतामधील कार्यालये अगदीच मामुली स्वरूपाची असतात. या देशात विदेशी खाजगी भांडवलाची जी एकूण गुंतवणूक झालेली आहे, त्यांत खाजगी ब्रिटिश भांडवलाचा पहिला क्रमांक लागतो. कारण, ब्रिटिश लोकांना या देशाची फार चांगली माहिती आहे. दुसरा नंबर अमेरिकेचा लागतो व त्यानंतर मग पश्चिम जर्मनी व इतर देशांचा क्रम लागतो. या देशांत जे नवे खाजगी भांडवल आले आहे, त्यांपैकी ७० टक्क्यांपेक्षा जास्त भांडवल ब्रिटन व अमेरिकेचे आहे.

विदेशी खाजगी भांडवलाने या देशात अनेक क्षेत्रांत प्रवेश केला आहे. पण त्यांपैकी महत्त्वाच्या बाबी म्हणजे पेट्रोलियम, रिफायनिंग आणि इतर कारखानदारी व त्यांत अन्न, मादक पेये, सुती कापड, वाहतुकीची साधने, मशिनरी व मशिन टूल्स, धातू व धातूच्या वस्तू, इलेक्ट्रिकल माल व मशिनरी, रसायने व तत्सम पदार्थ यांचा समावेश आहे.

भारतामध्ये जे परदेशी भांडवल गुंतवण्यात आलेले आहे, त्याला नफा मिळविण्याची मुख्य जागा निर्गत बाजारपेठ नसून, भारताची अंतर्गत बाजारपेठच असते आणि खरे म्हणजे परदेशी भांडवल या देशात येते, याचे मुख्य कारण स्वतःच्या देशात जो नफा मिळू शकतो, त्यापेक्षा जास्त प्रमाणात नफा या भांडवलाला भारतातील गुंतवणुकीमुळे मिळत आला असून, अद्यापिही तो तसाच मिळत आहे. युनोलिव्हर, आय. सी. आय., मेटल बॉक्स कं. लि. यांच्या नफ्याच्या प्रमाणावरून ही गोष्ट सहज ध्यानात येण्यासारखी आहे. सरासरीने हे नफ्याचे प्रमाण तेथे मिळणाऱ्या नफ्यापेक्षा ८० ते ९० टक्क्यांनी जास्त आहे. उत्पादनक्षमतेच्या दृष्टीने विचार करता कामगारांवर होणारा खर्च भारतामध्ये कमी असून, मालविक्रीच्या किंमती मात्र इतर देशांपेक्षा भारतामध्ये जास्त आहेत. परदेशी भांडवलाला या देशात कराच्या बाबतींतही काही प्रोत्साहनादाखल सवलती देण्यात आलेल्या आहेत. जगातील बाजारपेठांची आपसांत विभागणी करण्याचा आणि एकमेकांच्या बाजारपेठांना दुसऱ्याच्या चढाओढीची झळ लागणार नाही, अशी तजवीज करण्याचा बड्या देशांचा प्रयत्न नेहमीच चालू असतो. भारतामध्ये आपले भांडवल गुंतविण्याची तयारी दाखविणारांच्या बाबतीत येथील सत्ताधाऱ्यांच्या मनात अनुकूल भावना निर्माण होत जाते, त्यामुळे जो माल भारताला विकण्याची या देशांची वा खाजगी भांडवलदारांची इच्छा असते, त्याच प्रकारच्या मालाची आयात आपणांकडून वाढविली जाते. त्यामुळे आणखी भांडवलगुंतवणूक वाढेल, अशी सबळ आशा या सत्ताधाऱ्यांच्या मनात निर्माण होते. एकूण भागभांडवलापैकी इक्विटी होल्डिंग ४० ते ५० टक्क्यांपेक्षा कमी असूनही अनेक कारखान्यांमध्ये आर्थिक व व्यवस्थापनीय नियंत्रण परदेशी लोकांच्या हातांतच असते. तंत्रविषयक ज्ञानही बहुधा त्यांच्या मुठीतच बंदिस्त असते.

काही बाबतींत परदेशी खाजगी भांडवलाला जरुरीपेक्षा अधिक रकमेचा



**स्थानिक गुणी तज्ज्ञ डावलून परदेशी तज्ज्ञांना पाचारण.**

परवाना दिला गेल्यामुळे (ओव्हर-लायसेन्सड) अशा तऱ्हेच्या भांडवलाची वाजवीपेक्षा अधिक प्रमाणांत आयात झालेली आढळते. त्यामुळे आपल्यावरील बोजात वाढ झाली आहे. **आणि हा सर्व पसा सॉफ्ट ड्रिंक्स्, शाई, बॉल-पॉइंट पेन, टूथ-पेस्ट, ब्रशेस, रेझर-ब्लेडस्, रेफ्रिजरेटर्स इत्यादी ग्राहकांच्या नित्योपयोगी वस्तूंमध्ये खर्च झालेला आढळतो.** आपणांला ज्या यंत्रसामग्रीची व इतर साहाय्यकारी गोष्टींची जरुरी असते त्यांची किंमत अगोदरच फुगवून ठेवली जाते व त्यामुळे अशा खरेदीने विदेशी खाजगी भांडवलदारांचे येथील कारखान्यांवर वर्चस्व निर्माण होते व खऱ्या नफ्याचे प्रमाण झाकून ठेवणे शक्य होते. तसेच विदेश तंत्र हे त्या त्या देशांत जरी सोयीचे असले तरी आपल्या देशात ते तसेच सोयीचे ठरेल अशी काही खात्री देता येत नाही. पुष्कळ वेळा सर्व्हिसिंग व इतर पूरक उद्योग येथे नसतातच. तांत्रिक कामाची सर्व सूत्रे बहुधा परदेशी व्यक्तीकडे असतात व तो आपल्या भारतीय साहाय्यकांना आपले काम शिकविण्यास फारसा उत्सुक नसतो. स्थानिक परिस्थितीचे त्याला पुष्कळ वेळा अजिबात ज्ञान नसते. काही बाबतींत अनवश्यक व दुबार सहयोग केलेला आढळून येतो. तातडीच्या दृष्टीने ज्यांचा गुणानुक्रम फारच खाली अशा प्रकारच्या काही उद्योगांमध्येही खाजगी परदेशी भांडवल गुंतवण्यास परवानगी दिलेली आढळून येते. स्थानिक गुणी तज्ज्ञ सल्लागार म्हणून उपलब्ध असतानाही परदेशी तज्ज्ञांना सरकारने पाचारण केलेले आढळून येते. विदेशांकडून सरकारी पातळीवर मिळविलेल्या कर्जांच्या व्याजाचा दर २ ते ३ टक्केच असला तरी खाजगी विदेशी भांडवलवाल्यांना केवळ नफ्याच्या रूपाने १० टक्क्यांपेक्षा जास्त लाभ सरासरीने मिळत असतो. याशिवाय फी व रॉयल्टीच्या रूपाने लाभ होतो तो निराळाच. शिवाय काही करारांतील शर्तीनुसार खाजगी भांडवलापैकी काही भाग स्वदेशी परत रवाना करणे जरुरीचे असते. अशा प्रकारच्या तरतुदीनुसार १९४८ ते १९६१ या कालावधीत भारतामधून परदेशांकडे ७१८ कोटी ४० लक्ष रुपये रवाना झाले आहेत. पण याच काळात परदेशांतून

पैसा व मालाच्या रूपाने येथे येऊन झालेली एकूण गुंतवणूक २४७ कोटी १० लक्ष रुपये आहे. या दोन्ही रकमांमधील ४७१ कोटी ३० लक्ष रुपयांचा फरक म्हणजे या काळात या देशावर निर्माण झालेला परदेशी चलनाचा बोजा होय.

**म्हणजे विदेशी भांडवलाला या देशात येण्यासाठी आकर्षित करण्याच्या प्रयत्नांचा परिणाम मात्र असा झालेला आहे की, या कालखंडात याच देशातून फार मोठ्या प्रमाणावर पैसा विदेशांकडे रवाना झालेला आहे.**

बोनस इक्विटी शेअर्स काढल्यामुळे व कॅपिटल अॅप्रिसिएशनमुळे या देशातील परकीय भांडवलात आपोआप वाढ होत गेली असून, त्यामुळे आपल्या निर्गतीच्या कमाईपेक्षा आपले आयातीवरचे देणेच वाढत गेले आहे. ज्या धंद्यांत गुंतवणूक केली असेल त्या धंद्यावरील नियंत्रणाची सूत्रे अद्यापि विदेशी खाजगी भांडवलदारांनी आपल्या हाती ठेवली असून, आपले तांत्रिक कसबही एखाद्या रहस्याप्रमाणे त्यांनी जतन करून ठेवले आहे. विदेशी खाजगी भांडवल ही अशा तऱ्हेने एक निर्भेळ आपत्तीच ठरली आहे.

## उपाययोजना

प्रगत देशांची सरकारे व आंतरराष्ट्रीय संघटना यांच्याकडून मिळालेल्या परकीय मदतीमुळे आपली आयात-निर्गत व्यापारामधील तफावत प्रतिवर्षी जवळजवळ ५०० कोटी रुपयांनी कशी वाढली त्याचा ऊहापोह आतापर्यंत केलाच व यातून बाहेर पडण्याचा पारंपरिक मार्ग एकच असतो व तो म्हणजे जुनी कर्जे भागविण्यासाठी नवी कर्जे उभारणे.

रुपयाच्या तुलनात्मक किमतीत (पार व्हॅल्यू) घट झाल्यामुळे, रुपयांच्या प्रमाणातील आपल्या कर्जाच्या आकड्यात एकदम खूपच वाढ झाली आहे. परदेशी भरणा करावयाच्या आपल्या बोजात विदेशी खाजगी भांडवलामुळे वाढ झाली असून, ज्या प्रमाणात परदेशाकडे आपण पैसा रवाना करू त्याच प्रमाणात विदेशी भांडवल आपल्या देशात येत राहील या आशेला मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे यावर काहीतरी जालीम उपाय शोधून काढावयास हवा हे अगदी उघड आहे. परदेशी जाणाऱ्या व त्या बाजूने येणाऱ्या पैशावर नियंत्रण ठेवणे हा यावर दुर्दैवाने उपायच होऊ शकत नाही. इतर अनेक उपायांबरोबर ज्या अंतर्गत चलन व आर्थिक धोरणामुळे ही तफावत वाढत गेली त्या धोरणामध्येही फरक करावयास हवा. यापुढे विदेशी मदतीवर अधिक काळ अवलंबून राहून आपले काही हित साधणार आहे काय, याचा आपण विचार करावयास हवा. विदेशी मदतीकडे केवळ भांडवल पुरवठ्याचा मार्ग याच दृष्टीने मुख्यतः आपण पाहत राहिल्यामुळे पक्ष्याच्या डोळ्याऐवजी सर्व झाडावरच लक्ष ठेवीत आलो आहोत. आपल्याला निखालसपणे प्रथम कशाची गरज असेल तर ती तांत्रिक ज्ञानाची (टेक्निकल नो हाऊ) व दुसरे म्हणजे



**परदेशांकडून एक पैही उसनी घ्यायची नाही.**

आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेल्या परदेशी यंत्रसामग्रीची. पण जर आवश्यक ते तांत्रिक ज्ञान पैदा केले आणि आधुनिकीकरणासाठी आवश्यक असलेली यंत्र-सामग्री जर आपण निर्माण करू शकलो तर आपले खूपसे काम फत्ते झाल्यासारखे होणार आहे. भांडवलाच्या चणचणीमुळे विकासाचा वेग काही काळ जोरदार राहणार नाही; पण अखेरीस, आपला विकासाचा वेग इतर अप्रगत देशांच्यापेक्षा जास्त होईल. इतकेच नव्हे तर गेल्या २० वर्षांत आपला जो वेग होता त्यापेक्षाही जास्त गती आपल्या आर्थिक विकासाच्या कार्याला प्राप्त होईल. **विदेशी मदतीशिवाय रशियनांचा कार्यभाग जर चालू शकला आणि रशियन तज्ज्ञ एकाएकी निघून गेले, त्यांनी शेकडो करार रद्द केले तरी जर चीनला निर्माण झालेल्या अडचणींना तोंड देता आले तर तीच गोष्ट आपणांला करता येणार नाही काय?**

यादृष्टीने पहिले पाऊल टाकावयाचे तर यापुढे परदेशांकडून एक पैसुद्धा उसनी घ्यावयाची नाही, असा आपला कृतनिश्चय आपण जाहीर करावयास हवा. ही गोष्ट केली तर कर्जाच्या परतफेडीचा आकडा जो सध्या सारखा फुगतो आहे त्याला आळा बसेल. त्यानंतर दुसरे असे की आपण आपल्या सावकारांना सांगितले पाहिजे की, परतफेडीची मुदत वाढवल्याशिवाय आणि व्याजाचा दर कमी केल्याशिवाय आम्हांला व्याज आणि कर्जाच्या परतफेडीचे हप्ते देता येणे शक्य नाही. घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी किमान ५० वर्षांची मुदत तरी मिळावयास हवी. जे देश आपणांला यंत्रसामग्री पुरवावयास आणि आपल्या लोकांना तांत्रिक ज्ञानाचे प्रशिक्षण द्यावयास तयार आहेत व रुपयांच्या स्वरूपात कर्जाची परतफेड स्वीकारावयास तयार आहेत अशा देशांकडून यापुढेही आपण उधार-उसनवार करण्यास हरकत नाही. साम्यवादी (सोशॅलिस्ट) देशांनी प्रारंभीच्या काही वर्षे हेच केले. तिसरी गोष्ट अशी की, विदेशी नियंत्रण असलेल्या कारखान्यांना आपण असे सांगितले पाहिजे की, तुमचे नफे, रॉयल्टी, फी इत्यादी गोष्टींची भरपाई या देशातून जो माल परदेशी पाठवू त्यातूनच करून घ्यावी लागेल. ही बंधनकारक अट जे मान्य करणार नाहीत त्यांची

या देशातील जिंदगी सरकारजमा होईल असे त्यांना स्वच्छपणे बजावण्यात आले पाहिजे. चौथी गोष्ट अशी की, निर्गत व्यापारामुळे जे परदेशी चलन आपणांला उपलब्ध होते ते सर्व रिझर्व्ह बँकेच्या एका खास शाखेने आपल्या हुकमतीखाली घ्यावे व निकडीच्या क्रमांनुसारच या शाखेने आयात करण्यास मुभा द्यावी. पण आपणांला मिळणाऱ्या परदेशी चलनाच्यापेक्षा जास्त रकमेची आयात कधीही होता कामा नये. असे केल्याने अनेक कारखान्यांना आपल्या गरजेसाठी लागणारा मध्यस्थ (इंटर-मीजिएटस्) स्वरूपाचा माल परदेशांतून आयात करण्याचे बंद करावे लागले तर त्याला या देशाचा काही इलाज नाही. अशा तऱ्हेची परिस्थिती निर्माण होण्यास या कारखान्याचे चालकच जबाबदार आहेत. श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांच्या कारकीर्दीत शेकडो कारखान्यांना जे बेगुमानपणे परवाने देण्यात आले त्याचे दुष्परिणाम या एकाच मार्गाने नष्ट होऊ शकतील. मग या कारखान्यांना आयात मालाची जागा घेऊ न शकेल असा या देशातील पर्यायी माल शोधून काढावाच लागेल. विदेशी चलनाच्या चणचणीच्या खड्ड्यातून या देशाला वर काढण्यास समर्थ अशी बुद्धिमत्ता आणि तांत्रिक कसब आपणांजवळ भरपूर प्रमाणात आहे अशी माझी खात्री आहे. शिवाय विदेशी चलन मिळविण्याच्या सक्तीने नफे, फी व रॉयल्टी यांची फेड सुलभ होईल व त्याकरिता आवश्यक तितका माल निर्गत करण्याची तयारी ठेवावी लागेल.

**शेवटची गोष्ट म्हणजे अमेरिकन गहू व तांदूळ यांची विक्री करून, रुपयाच्या स्वरूपात नवे भांडवल तयार करण्याच्या मोहाला भारत सरकारने बळी पडता कामा नये. अन्नस्वावलंबन यशस्वी करण्यासाठी या देशातील प्रयोगाने आपल्या प्रयत्नांची शिकस्त करायला हवी आणि अमेरिकेतून आपण अन्नधान्य आणावयाचे बंद केले व जे अन्नधान्य उपलब्ध होईल ते जर आपण सर्वांना सारखे वाटून दिले तर आपला देश अन्नाच्या बाबतीत स्वावलंबी करणे शक्य आहे, अशी खात्री आहे.**

परदेशी सहयोगाच्या मार्गाने यापुढे परदेशी भांडवल या देशात येण्याचा मार्ग तावडतोब बंद झाला पाहिजे आणि तांत्रिक साहाय्य किंवा यंत्रसामग्री यांची जरुरीच पडली तर ती रोखीच्या व्यवहाराने प्राप्त करून घेतली पाहिजे.

निर्गत व्यापार वाढवून परदेशी चलन मिळविण्याच्या आपल्या उद्दिष्टांत फार मोठी वाढ होईल अशी फारशी अपेक्षा करण्यात अर्थ नाही. अवमूल्यनामुळे निर्गत व्यापारात अपेक्षेप्रमाणे वाढ झालेली नाही. भांडवलशाही जगात सध्या जी बिकट परिस्थिती व आर्थिक दाणादाण सुरू झाली आहे तिच्या संदर्भात विचार करता आपल्या निर्यात व्यापाराच्या आधारात वा किंमतीत फारशी सुधारणा होईल अशी अपेक्षा करणे अव्यवहारीपणाचे ठरणार आहे. समाजवादी देशांशी व्यापार सुरू करणे किंवा असेल तर त्यात वाढ करणे हाच एक खरा व टिकाऊ स्वरूपाचा मार्ग ठरणार आहे. प्रत्यक्षात अगदी अलीकडेच रशिया व इतर पूर्व युरोपातील देश

यांच्याशी आपले जे व्यापारी करार झाले त्यामुळे इंजिनीअरिंग धंद्यातील पिछेहाटीची तीव्रता पुष्कळच कमी झाली आहे. आपल्या सरहद्दीच्या प्रश्नावर कायम स्वरूपाची तोड एकच आहे व ती म्हणजे सरहद्दीपलीकडील देशांशी दृढ मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे. चीनचा बागुलबुवा वेळी अवेळी उभा केल्यामुळे फारच थोड्यांची फसगत होऊ शकेल. आपल्या सरहद्दीच्या प्रश्नाबाबत आपण जर शहाणपणाची व समंजसपणाची भूमिका घेतली तर आपल्या संरक्षणविषयक खर्चात ५० टक्क्यांनी सहज कपात करता येईल. आणि तसे केल्यास दरवर्षी जे ५०० कोटी रुपये वाचतील त्यांचा उपयोग खऱ्याखुऱ्या औद्योगिक वाढीसाठी करता येईल. शिवाय, लष्करासाठी विदेशी जड सामान खरेदी करण्यासाठी सध्या आपण जो पुष्कळसा खर्च करतो तो पण आपल्याला थांबविता येईल.

आपल्या शासनयंत्रणेचा जो विस्तार करण्यात आला आहे, त्यापैकी फार मोठा भाग हा सर्वस्वी अनवश्यक आहे. सरकारी व खाजगी क्षेत्रात ज्या नव्या उद्योगांची भर पडली आहे त्यांच्यामध्येही असाच अनवश्यक विस्तार झालेला आहे. समाज कल्याणाच्या नावाखाली आज जे काही केले जात आहे त्यांपैकी पुष्कळसा भाग निरर्थकच आहे. समाजधारणेसाठी पायाभूत स्वरूपाच्या अशा गोष्टी निर्माण करण्याअगोदर जर समाजोपयोगी अशा वरकड यंत्रणा निर्माण करण्यावर खर्च केला जाऊ लागला तर ते एक बेवकूफपणाचे नियोजन ठरेल. अशा प्रकारच्या उधळपट्टीमुळे तथाकथित विकासकार्यासाठी आपणांला तुटीचा अर्थभरणा करण्यावाचून गत्यंतर उरलेले नाही आणि आपण चलन फुगवट्यामुळे वेतन–किंमती वाढत जावयाच्या आणि किंमती वाढल्या तरी उत्पादनात वाढ व्हावयाची नाही, या खोल दरीच्या टोकावर येऊन ठाकलो आहोत. उत्पादनात वाढ होत असेल किंवा मालाच्या पुरवठ्यात विस्तार होत असेल तरच खेळते चलन किंवा कर्जे यांचा विस्तार समर्थनीय ठरत असतो. उत्पादनाला आवश्यक असलेल्या मालाच्या निर्मितीत वाढ होऊन त्यामुळे ज्या प्रमाणात उपभोग्य मालाच्या निर्मितीत वा पुरवठ्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष वाढ होणार असेल त्याच प्रमाणांत चलनवाढ किंवा कर्जे समर्थनीय ठरत असतात. आपल्या आर्थिक नियोजनाच्या इतिहासात क्रेडिटबाबतचे हे नियंत्रण कधीच पाळले गेलेले नाही.

वर जी जालीम उपाययोजना सुचविली आहे तीमुळे आपल्या विकासाच्या कार्यक्रमात अनेक अडचणी निर्माण होतील, क्वचित विस्कळीतपणा येईल किंवा पिछेहाटही होईल याची मला जाणीव आहे. परंतु या अडचणीतून आपला देश खचित बाहेर पडेल; इतकेच नव्हे तर तो अधिक बलशाली होऊन त्याला आपल्या भवितव्याबद्दल अधिक आत्मविश्वास आलेला असेल. या मार्गाने जाऊनच आपल्या अर्थव्यवस्थेला प्राप्त झालेले आश्रिताचे स्वरूप आपणांला झुगारून देता येईल आणि तिला स्वतःच्या मार्गाने विकास करण्याचे सामर्थ्य प्राप्त करण्यात आपण यशस्वी ठरू. ○

# एनव्हाळ ?

? ? ? ? ? ? ? ?

टिक्, टिक्, टिक्, टिक्, टिक्, टिक् !.......

सेकंद काटयाचा प्रवास सुरू आहे. त्याच्या मागोमाग मिनिटकाटा, मग तासकाटा !

आता रात्रीचे दोन वाजून गेले आहेत, पण मला अजून झोप येतच नाही ! पाच पाच मिनिटांनी आमच्या बेड टेबलावरच्या घडयाळाचे रेडियमचे काटे मी न्याहाळतो आहे. मग माझी नजर वळते. माझ्या लाडक्या शीलूच्या शांत प्रसन्न चेहऱ्याकडे ! दिवसभर वणवण करून ती स्वस्थ झोपली आहे. मधूनच तिचा मूळचा गोड चेहरा हास्याच्या लकेरीने न्हाऊन निघतो कदाचित्, कदाचित्. तिला स्वप्न पडत असेल !

तिच्या बाळासंबंधीचे ? तिच्या, माझ्या, आमच्या होणाऱ्या बाळासंबंधीचे ! शक्य आहे, तिला सहा महिने होऊन गेले आहेत ! गरोदरपणी निर्माण होणारी आगळी तृप्तता तिच्या चेहऱ्यावरून ओसंडते आहे आणि ! मी ?

मी तळमळतो आहे. माझ्या डोळयांसमोर उभे राहत आहे माझे हॉस्पिटल ! सर्जरीचे. पुण्यातला एक प्रख्यात सर्जन म्हणून, एक यशस्वी डॉक्टर म्हणून माझ्या हॉस्पिटलमध्ये लागणारी रीघ आणि मध्येच आठवण होते, त्या लाल-पांढऱ्या स्टँडर्ड मोटरची आणि तिच्यातल्या तसल्याच लाल-पांढऱ्या पिकुटलेल्या मिस् जोशीची!

मोहन कुंटे

मला आठवतंय ! केवळ एका महिन्यापूर्वीची गोष्ट. बरोबर ! तीन एप्रिल ! माझा नेहमीसारखाच एक गडबडीचा दिवस. तिसरी पेशंट होती मिस् जोशी ! माझ्या साधारण ओळखीच्या एका डॉक्टरने पाठवलेली. कारण...वीक् हार्ट !

मी तिची बरीच तपासणी केली. कार्डिओग्राम घेतला, एक्सरेज् घेतले. स्क्रीनिंग केले. आणि शेवटी माझ्या घ्यानात आले की हार्टच्या व्हॉल्व्हच नीट काम करीत नाहीत. ताबडतोब जर मेजर ऑपरेशन केलं तरच पेशंट जगेल. नाही तर....?

पण तशी वेळच आली नाही. पैशाचा प्रश्नच नव्हता कारण मेजर जोशी यांनी भरपूर पैसा ठेवूनच प्राण सोडले होते. त्यांच्या संपूर्ण इस्टेटीची वारस होती मिस् जोशी आणि तिचा पांगळा भाऊ !

जवळजवळ सहा तास लागणारे, कृत्रिम हार्ट वापरून करावे लागणारे ऑपरेशन यशस्वी झाले होते. मलाही बरीच फी मिळाली आणि मिस् जोशी जी आतापर्यंत अत्यंत दुबळचा दुखणेकऱ्याचे जीवन आज पस्तीस वर्षे घालवत आली होती ती एखाद्या नॉर्मल बाईसारखी सत्तरी गाठणार होती ! तीन मे ! बरोबर एका महिन्या-नंतर तिला डिसचार्ज दिला होता. ती स्वतःच्याच पायांनी घरी गेली होती.

पण दुसऱ्याच दिवशी ?

मी साधारणपणे आठ ते बारा कन्सल्टेशन्स करतो आणि दुपारी ऑपरेशन्स ! पण त्या दिवशी मी माझ्या रूममध्ये गेल्याबरोबर माझ्या रिसेप्शनिस्टने मल धक्काच दिला.

ती म्हणाली, "डॉक्टर, ती बाई...ती बाई."

"कोण बाई ?"

"ती मिस् जोशी. ती पुन्हा आली आहे. सकाळी सातपासून दाराशी थांबली आहे !"

"छे ! कालच तर तिला डिसचार्ज दिला. बरं पण तिची काही तक्रार ?"

"काहीसुद्धा नाही. फक्त तुम्हांला भेटायचंय !"

"चमत्कारिकच आहे झालं ! पण तिने काही अपॉइंटमेंट घेतलेली नाही ! बसू दे तिला. आधी बाकीच्यांचे पाहू.

मग मी तिला जवळजवळ विसरूनच गेलो. एकामागून एक येणाऱ्या पेशंटमध्ये डोके वर काढायलासुद्धा फुरसत झाली नाही.

शेवटच्या पेशंटला वाटेला लावून मी जरा श्वास घेतो आहे, तोच रिसेप्शनिस्ट आत येऊन म्हणाली, "ती अजून आहेच बाहेर !"

मी चक्रावलोच. आठ ते साडेबारापर्यंत ही बाई नुसती बसून राहिली आहे बाहेर ! काही कारणाशिवाय ?

म्हणालो बघू या तरी काय भानगड आहे. तिला आत बोलावले आणि रिसेप्शनिस्टला दोन कॉफी पाठवून द्यायला सांगितले !

" हं काय, मिस् जोशी ! बरे आहे ना आता ?"

बाई काही बोलेचना. नुसती माझ्याकडे पाहत राहिली खुळ्यासारखी. मग म्हणाली,

" मिस् जोशी काय परक्यासारखं ? मला नीना म्हणालात तरी चालेल."

बापरे ! हे प्रकरण जरा सांभाळूनच घ्यायला हवं. मग मी ठरवले की ह्या बाईच्या मनावर परिणाम झालेला दिसतो आहे. आयुष्यभर घाबरून एखाद्या क्रिपलसारखे एकलकोंडे आयुष्य घालवल्यावर अचानकपणे पुन्हा नवजीवन लाभल्यामुळेच हे घडले होते. एवढ्या मोकळ्या वेळाचे काय करावे हे न समजूनच बाईची अशी अवस्था झाली असावी !

कॉफी घेता घेता बाई बोलू लागली,

" डॉक्टर, मला घरी राहवतच नाही. गेला महिनाभर रोज तुम्ही दिसत होता, तुमचा आवाज ऐकू येत होता. तुमच्याशिवाय राहणे अशक्य झाले आहे मला !"



" अहो, पण तुम्हांला माहीत नाही का, माझे लग्न होऊन तीन वर्षे झाली आहेत. माझा संसार अगदी चांगला चालला आहे."

" ते ठाऊक आहे मला. मी जास्त काही मागत नाही पण कधीतरी तुम्ही मला भेटलं पाहिजे. कॉफी घेतली पाहिजे माझ्याबरोबर, फार नाही आठवड्यातून एक-दोनदाच !"

" पण ते कसं शक्य आहे ! लोक काय म्हणतील. छे: अगदीच ॲबसर्ड ! ते काही जमायचं नाही. तुम्ही आता असे करा माझा एक डॉक्टर मित्र आहे. सायकीॲट्रीचा. माझी चिठ्ठी घेऊन तुम्ही त्याच्याकडे जा ! तो सगळे बरोबर करील आणि कुणीही एखादा चांगला माणूस भेटेल तुम्हांला आणि कुणी सांगावं तुम्ही संसारही चांगला कराल !"

चिठ्ठी घेऊन बाई गेल्या. माझ्या दृष्टीने मी प्रकरण संपवले होते. पण पुन्हा

दुसऱ्या दिवशी मी हॉस्पिटलमध्ये वळून मोटार पार्क केली तर बाहेरच्या रस्त्यावर एका बाजूला तांबड्या-पांढऱ्या स्टँडर्डमध्ये थंडगार निर्विकार चेहरा ठेवून मिस् जोशी शांतपणे बसून होती.

पण मी दुर्लक्षच करायचे ठरवले. पण बारा वाजता मी बाहेर पडू लागलो तेव्हाही बाई तशी त्या मे महिन्याच्या उन्हात शिजत बसली होती. मी जेवायला घरी गेलो तशी घरापर्यंत माझ्या मागोमाग येत होती. घर जसे जवळ आले तशी ती वळून दुसऱ्याच रस्त्याने निघून गेली ! माझे डोके भणभणून गले. वास्तविक शिलू माझ्यासाठी जेवायची थांबली होती पण उगीच तिच्यावर कावलो. जेवणात काही-तरी खोडी काढून स्वैपाकाच्या बाईलाच बोललो आणि नशीब म्हणूनच त्या दिवशी ऑपरेशन्स नव्हती म्हणून झोपेच्या दोन गोळ्या घेऊन स्वस्थ पडून राहिलो.

तास-दोन तास पडून राहिल्यावर जरा बरे वाटू लागले तोच नोकराने पोस्ट-मनला दार उघडले ! माझ्या नावाचे रजिस्टर्ड पार्सल ? कोणाकडून तर नाव पत्ता काहीच नाही ! म्हणालो उघडून तर पाहू ! काय असेल आत त्यावरून तरी पत्ता लागेल. पण आतून निघाला क्रिस्टल ग्लासचा एक सुंदर फ्लॉवर पॉट ! शिलूला तर तो इतका आवडला ! पण माझ्या मनात निराळीच शंका आली. मी भेटण्याचे नाकारले म्हणून तर...

शिलू जरा खट्टू झाली. तरीही मी तो फ्लॉवर पॉट पुन्हा बंद करून परत पाठवून दिला. असेच आणखी दोन दिवस गेले. रोज हॉस्पिटलसमोर तर ती तांबडी-पांढरी गाडी कोडासारखी रोज माझ्या डोळ्यांत खुपत होतीच; पण आता माझ्या बंगल्या-समोरही ती रोज उभी राहू लागली. तीच तांबडी पांढरी गाडी ! तोच बर्फाळ पिकुटलेला चेहरा, तेच दीनवाणे डोळे !

ही गोष्ट शिलूच्याही ध्यानात आली, " ही बया रोज कुणाची वाट पाहत उभी राहते कुणास ठाऊक ? बरं आणि एवढ्या उन्हात बंद गाडीत बसवतं तरी कसं हिला ! आणि बरका आज तर माझ्याकडं अशा खुनशी नजरेनं बघत होती ? मी तिचं काय घेडं मारलंय देव जाणे ! "

ओह माय गॉड ! आतापर्यंत ती मलाच त्रास देत होती. आता शिलूवरही तिची नजर वळली तर बघायलाच नको. शिलूचा स्वभाव फार तापट आहे आणि जरका तिला त्या बाईची हकीकत कळली तर ती काय सीन करील भर रस्त्यात ठाऊक नाही ! शिवाय ह्या अवस्थेत सहा महिने गेले असताना असा मानसिक ताण तिच्यावर पडला तर...देवा, नकोच तो प्रसंग !

आतापर्यंत मी करुणेच्या भावनेने, दया करावी म्हणून तरी दुर्लक्ष करीत होतो. पण त्याची जागा आता संतापाने घेतली. माणसाला स्वतंत्रपणा, प्रायव्हसीचा काही अधिकार आहे की नाही ?

त्याच दिवशी रात्री, दहा वाजले होते. मी रोजच्यासारखा रेडिओ लावून

बसलो होतो. पण मन भिरभिरतच होते.

ट्रिंग, ट्रिंग......ट्रिंग, ट्रिंग......शिलूने फोन घेतला. कुणी पेशंट दिसतोय म्हणून माझ्या हातात दिला ! तोच चिरकटलेला बुळबुळीत आवाज माझ्या कानांत घुमायला लागला.

" डॉक्टर, मला अगदी राहवत नाही हो ! खाजगी पेशंट आहे असं सांगून लगेच निघून या ! बायकोला तुमचा संशयही येणार नाही. माझा पत्ता तुम्हांला ठाऊक आहेच......ओह हाऊ आय लव्ह यू ! यू मस्ट कम डॉक्टर. तुम्ही नाही आलात तर मी जीव देईन डॉक्टर...प्लीज...डॉक्टर प्लीज......आणि."

" सॉरी मी खाजगी व्हिजिट्सना जात नाही " म्हणून फोन बंद केला. अपराधी नजरेनं शिलूकडे पाहिलं. तिच्या डोळ्यांत संशय, भीती असं एक चमत्कारिक मिश्रण दिसत होतं. त्या रात्री काही मला झोप येईना. जरा डुलकी लागली की काही एका चमत्कारिक भीतीने मी दचकून जागा होई.

सकाळी उठल्याबरोबर मी चक्क वकिलाचा सल्ला घ्यायचा निश्चय केला. आणि आठ वाजण्यापूर्वीच माझ्या एका वकील स्नेह्याकडे गेलो. सरळ सरळ सगळी हकीकत त्याला सांगितली.

तो म्हणाला, " ह्यामध्ये तुझ्या व्यक्तिस्वातंत्र्याला बाध येतो हे खरे आहे. पण तुझी हकीकत मला पटली तशी ती पोलिसांना पटली नाही तर ?"

" अरे, पण जे खरे आहे ते पटायला काय हरकत आहे ?"

" हे पाहा अशा प्रकरणात पोलिसांची काय, न्यायधीशाची काय सहानुभूती नेहमीच बायकांकडे असते. आणि समजा तिने जर काही भलतीच गोष्ट रंगवून सांगितलीन तर त्या प्रसिद्धीचा तुझ्या धंद्यावर किती परिणाम होईल याचा काही विचार ?"



गोष्ट खरी होती. सर्वच धंदेवाल्यांना—विशेषतः डॉक्टरांच्या बाबतीत—तर अशा लोकप्रवादांना अगदी भिऊन वागावे लागते.

"आणि ही गोष्ट तुझ्या बायकोला कळल्याशिवाय राहणार आहे की काय?"

"ओह् ! गॉड ! जी गोष्ट आजपर्यंत मी तिला कळू दिली नाही ती तिला कळल्याशिवाय कशी राहील ?"

"आणि असं पाहा ! पोलिसात जाताना तिनं काय गुन्हा केला आहे असं सांगणार ? ती तुझ्याकडे पाहते की ती तुझा सारखा मोटरीतून पाठलाग करते, की फोनवरून तुला धमक्या देते ?"

"पण मला माणूस म्हणून स्वतंत्रपणे जगायचा काहीच अधिकार नाही का?"

"असेल. पण कायदा तुला याबाबत संरक्षण देणं जाणत नाही!"

"अरे, पण मिस् जोशीच्या खरंच मनावर परिणाम झाला आहे?"

"हे सिद्ध करता येणं किती अवघड आहे माहीत नाही तुला ? आणि जर ती अनसेन नाही असं ठरलं तर ती अब्रूनुकसानीबद्दल तुला कोर्टात खेचील त्याचं काय?

आजच सकाळी हे बोलणं झालं आहे. मी स्वतः काही करू शकत नाही. कायदा-पोलीस सगळं फुकट आहे. माझं काय होणार आहे ह्यापेक्षा शिलूपासून हे कोठपर्यंत लपेल ? रोज तीच तांबडी पांढरी गाडी पाहून, माझ्या घरासमोर, माझ्या हॉस्पिटलसमोर पाहून लोक काय म्हणतील ? माझा एवढा व्यवस्थित चाललेला धंदा बसणार की काय ? का मला गावच सोडून जावे लागणार? तिथे तरी ही बया येणार नाही कशावरून ?

सवाल ! सवाल !! सवाल !!!

कोणीतरी मला उत्तर देईल का ? मला झोपच येत नाही. रात्र रात्र मी जागून काढतो आहे !

का ? पण का ?

नितीन प्रकाशन, पुणे, यांनी ' शंभर मानवश्रेष्ठ ' या नावाची एक माला सुरू केलेली आहे. दहा मानवश्रेष्ठांचे एक पुस्तक अशी ही दहा पुस्तके प्रकाशित होणार आहेत. त्यांपैकी पाच पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. ही पुस्तके कुमारांकरिता लिहून घेतलेली आहेत. जगातील शंभर मानवश्रेष्ठांची ओळख कुमारांना करून देणे हा या मालेपाठीमागचा प्रकाशकांचा उद्देश आहे. हा त्यांचा उद्देश स्तुत्य आहे. मराठी भाषेत अशा प्रकारचे साहित्य प्रकाशित झाले पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळातील तरुण पिढीला उच्च आकांक्षांनी प्रेरित करणे, मनुष्याचा जगण्यापाठीमागचा अर्थ तिला शिकविणे आणि एकीकडे असा अर्थ समजावून देत असतानाच अशा प्रकारचे जीवन जगण्यासाठी जी मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक शक्तींच्या

# तरुणांपुढे योग्य आदर्श ठेवणारी पुस्तके

जोपासनेची तयारी आवश्यक असते अशा तयारीसाठी या तरुण पिढीला मार्गदर्शन करणे हे आजचे मोठे कर्तव्य आहे.

त्यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण, शारीरिक व्यायामाचे शिक्षण, सांस्कृतिक शिक्षण आणि शिस्तविषयक शिक्षण या चार प्रकारच्या शिक्षणांची नितांत आवश्यकता असते. हे शिक्षण कमीअधिक फरकाने शिक्षण—संस्थांमधून मिळत असते. परंतु याव्यतिरिक्त जे एक शिक्षण असते आणि ज्याचे महत्त्व फार आहे ते शिक्षण म्हणजे कुमार वयात असणाऱ्या मुलांमुलींमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे. परंतु ही आवड निर्माण करणे हे काम सोपे नाही; सोपे नाही तरीपण ते आज शक्य आहे. काल ते शक्य नव्हते. काल म्हणजे स्वातंत्र्यपूर्व कालात. त्या वेळी भारतातील मानवी जीवनाचा विकास परकीयांच्या स्वाधीन होता. या देशातील लोकांना किती, कसे व कोणते शिक्षण द्यावयाचे हे परकीय सत्तेने ठरवावयाचे होते. अर्थातच या देशाच्या भल्याबुऱ्याविषयी सोयर

सुतक असण्याचे इंग्रजी सत्तेला काहीच कारण नव्हते. त्यांच्या स्वार्थासाठी ज्या ज्या गोष्टींची या देशाला गरज असे त्याच गोष्टी केल्या अगर शिकविल्या जात; म्हणजे या देशातील तेव्हाचे मानवी जीवन सर्वांगीण विकासापासून परावृत्त ठेवले गेले होते. बरे, पारतंत्र्य येण्यापूर्वीचे या देशातील मानवी जीवन विकसित होते अशातलाही मुळीच भाग नव्हता. असे असते तर परकीय सत्तेला येथे पाय रोवण्यास संधी सापडती ना.

या संदर्भात हा एवढा विचार करण्याचे कारण एवढेच की मागच्या दोन्हीही अवस्थांत भारतातील तरुण पिढीपुढे जीवनाच्या संपूर्ण विकासासाठी काही आदर्श नव्हते. आणि जे आदर्श जगात होते ते साध्य करण्यासाठी प्रगत साहित्याचे जे माध्यम हवे असते तेही नव्हते! गेल्या तीनचारशे वर्षांत—निदान महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाले तरी—या देशात कोणते साहित्य प्रकाशित झाले आहे याची सूची केली तर त्यातील दुर्दशा व हेळसांडच आपल्या सहज लक्षात येईल. एखाद्या देशाच्या संस्कृतीचे मोजमाप त्या देशात प्रसिद्ध झालेल्या साहित्यावरून करता येते. त्या दृष्टीने पाहिले तर पूर्वीच्या काळात असे साहित्य मुळीच प्रसिद्ध झालेले नाही असे म्हणावे लागते.

त्यातही आमच्या तरुण पिढीसाठी तर असे कुठल्याही प्रकारचे साहित्य प्रकाशित झालेले नाही.

आज स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मात्र अशी परिस्थिती राहिलेली नाही. आणि अशी परिस्थिति झपाट्याने बदलत आहे. अगदी हजारोंच्या संख्येने नाही तरी शेकडोंच्या संख्येने तरुण पिढीसाठी साहित्य निर्माण होत आहे आणि प्रकाशितही केले जात आहे. पहिल्या पहिल्यांदा हे साहित्य पुराणकथांच्या, क्वचित जुन्या इतिहासकथांच्या रूपाने प्रसिद्ध झाले. नंतर हीही परिस्थिती बदलली आणि 'मौज प्रकाशन', 'पॉप्युलर प्रकाशन' सारख्या मातबर प्रकाशनांनी कुमारांसाठी उत्तम, दर्जेदार ललित साहित्य निर्माण केले. आज तर अशा साहित्याला बहर आलेला आहे. मी वर उल्लेख केलेल्या नितीन प्रकाशनाने कुमारांसाठी उत्तम पुस्तके प्रकाशित करण्याचे ठरवून 'शंभर मानवश्रेष्ठ' ही पुष्पमाला प्रसिद्ध करण्यासही सुरुवात केली. त्याचप्रमाणे पुण्याच्या इनामदार बन्धु प्रकाशनानेदेखील अशा वाङ्मयाच्या प्रकाशनाच्या बाबतीत मोठीच कामगिरी केलेली आहे. त्यांनी या विषयावरील कितीतरी पुस्तके आजवर प्रकाशित केलेली आहेत.

अगदी अलीकडेच 'भारतरत्न' या नावाची चार पुस्तके श्री. राजाभाऊ मंगळवेढेकर यांच्याकडून त्यांनी लिहवून घेतली आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील कला, साहित्य, विज्ञान आणि लोकसेवा या क्षेत्रांत विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या गौरवार्थ 'भारतरत्न' हा किताब भारताच्या राष्ट्रपतींकडून त्या त्या व्यक्तींना बहाल करण्यात येतो. हा किताब

उच्च सन्मानाचे प्रतीक आहे. असा बहुमानाचा किताब मिळविणाऱ्या चौदा व्यक्तींच्या जीवनाचा परिचय श्री. मंगळवेढेकर यांनी चार पुस्तकांत करून दिला आहे. या चौदा व्यक्ती भारतीय आहेत. भारताच्या रक्ता–मातीतून, भारताच्या भूमीवर फुललेली ही महान जीवने आहेत. त्या व्यक्तींमध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्यासारख्या तत्त्वज्ञ व्यक्तीच्या जीवनाची जशी ओळख करून दिली गेली आहे, तसेच महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्यासारख्या समाजसेवक, चंद्रशेखर व्यंकटरमण यांच्यासारख्या वैज्ञानिक, पं. नेहरूसारखा राजकारणी आणि लाल बहादूर शास्त्रीं-सारख्या महान त्यागी व्यक्तींनी या देशात जीवनविषयक जे आदर्श निर्माण करून ठेवले आहेत त्यांचा परिचय या लेखमालेत करून देण्यात आलेला आहे.

हे काम स्तुत्य आहेच, याविषयी मुळीच संदेह नाही. कुमारांना या जीवनांपासून निश्चित स्फूर्ती मिळेल. तसेच जगातील श्रेष्ठपद मिळविणाऱ्या मानवांचा, त्यांच्या जीवनांचा आणि त्यांच्या आदर्शांचा परिचय ' नितीन प्रकाशन, पुणे ' या प्रकाशन संस्थेने केलेला आहे. त्यांमध्ये विख्यात धर्मवीर, विख्यात क्रीडारत्ने, झुंजार सेनानी, यंत्रदेवाचे उपासक अशा निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्ती निवडून त्यांनी या व्यक्तींच्या जीवनांचे आदर्श कुमारांपुढे उभे केले आहेत. त्यांमध्ये भगवान कृष्ण, हजरत पैगंबर, स्वामी विवेकानंद, गौतमबुद्ध अशासारखे धर्मवीर, युजेन सँडो, मिहिर सेन, गॅरी सोबर्स, ध्यानचंदसारखे क्रीडापटू तर सिकंदर, राणी दुर्गा-वती, झाशीची राणी, नेपोलियन बोनापार्ट यांच्यासारखे शूर रणधुरंधर यांच्या जीवनांची ओळख करून दिली गेली आहे.

ही सारीच पुस्तके वाचनीयच नाहीत तर अभ्यसनीय आणि अनुकरणीय आहेत. अशी पुस्तके हजारोंच्या संख्येने प्रकाशित झाली पाहिजेत. आजचे युग हे विज्ञान-युग आहे. आजच्या तरुणाला विज्ञानाचा दृष्टिकोण समजावून देणे आणि त्याचबरोबर मानव हा केवळ विज्ञानाचा दास होऊन चालणार नाही तर विज्ञानाच्या प्रकाशात जगणारा मानव हा संपूर्ण मानव असला पाहिजे. अर्धवट अथवा अर्धविकसित मानव हा स्वतःचे आणि जगाचेही कल्याण करू शकत नाही. आणि पूर्ण विकसित मानव जर व्हावयाचे असेल तर विज्ञानाबरोबरच धर्म, इतिहास, तत्त्वज्ञान, अर्थ-शास्त्र, राजकारण आणि नीतिमत्ता यांचाही आपल्या जीवनात संपूर्ण आविष्कार झाला पाहिजे. म्हणजे विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांचा सुवर्णसंगम जीवनात झाला पाहिजे. अशा दृष्टीने त्या त्या क्षेत्रांतील जीवन आणि ज्ञान यांची योग्य ओळख साहित्याच्या द्वारा कुमारांना करून दिली पाहिजे. इनामदार बन्धु प्रकाशन आणि नितीन प्रकाशन या क्षेत्रात आणखी पुढे जातील तर तीही एक समाज-सेवाच त्यांच्या हातून घडेल.

**— वि. शं. पारगावकर**

२३ नोव्हेंबर १९६८

# नांदा सौख्यभरे

लघुकथेचा एखादा संग्रह आपण वाचायला घेतो. कथांमागून कथा वाचून काढतो आणि हातांतले पुस्तक बाजूला गळून पडते. वाचलेल्या प्रत्येक कथेबद्दल आपलं स्वतःचं असं मत तयार झालेलं असतं. काही कथा आपल्याला आवडतात आणि त्या विशिष्ट ठसा मनावर उमटवून जातात. पण न आवडलेल्या कथा तशाच हळुवारपणे विरून जातात. असाच काहीसा प्रकार 'नाटयद्वै'च्या 'नांदा सौख्यभरे' या नवीन प्रयोगाबाबत आहे.

सई परांजपे व अरुण जोगळेकर ही दिल्लीहून निघालेली तरुण कलावंत मंडळी पुण्यापर्यंत आपला नवीन खेळ घेऊन आली व अपेक्षेप्रमाणे त्यांनी नावीन्याने नटलेली आपली कलाकृती प्रेक्षकांसमोर सादर केली.

तसं पाहिलं तर हे एक नाटक नाही. नाटकाच्या पारंपरिक दृष्टीनेही आणि नवनाटयाच्या दृष्टीनेही. हा एक बहुरूपी प्रयोग आहे. अरुण जोगळेकर, सई परांजपे, कल्याण वर्दे आणि ललिता केंकरे या चार गुणी कलावंतांच्या प्रतिभेचे एक आगळे-वेगळे आणि आकर्षक स्वरूप या प्रयोगात पाहायला मिळते.

'नांदा सौख्यभरे' या काहीशा जुन्या पठडीतील नावाखाली या मंडळींनी एक अगदी वेगळया धर्तीचा प्रयोग सादर केला. सईबाईंच्या लिखाणाला तशी तर्कशुद्ध सलगता नाही. अवतीभंवती घडणाऱ्या घटनांचे सूक्ष्म निरीक्षण आणि त्या घटनांवरील स्वतःची मल्लीनाथी यांचे मिश्रण करून बाईंनीही बहुरंगी चटकदार मिसळ तयार केली आहे.

नवीन कोरे करकरीत दांपत्य, संसारासंबंधीच्या त्याच्या कल्पना, विवाहानंतर व्यावहारिक बनणारे प्रेम, आणि विवाहापूर्वीचा तो रोमांचकारी प्रणय या सर्वांचे खुमासदार दर्शन बाईंनी छोटया छोटया प्रवेशांतून घडवले आहे.



**सई परांजपे । अरूण जोगळेकर**

लग्नानंतर बराच कालावधी गेल्याने बाई संसारात मुरल्या आहेत. रोजचे ते चाकोरीतले जिणे जगून त्यांना कंटाळा आला आहे. आणि इच्छा आहे आता समाजकार्य करण्याची. पण आता समाजकार्य करायचे म्हणजे तरी नक्की काय करायचे, याची नीटशी कल्पना डोळ्यांसमोर नाही म्हणून मिस्टरांच्या साहाय्याने काही योजना बाई निश्चित करतात. त्यातून निर्माण होणाऱ्या प्रसंगांतून बाईंनी विनोद चांगला फुलविला आहे.

घडणाऱ्या घटनांना स्थळकाळाचे बंधन नाही. जागा कोणतीही असो, तो आणि ती एकत्र आल्यावर जे प्रसंग निर्माण होणार त्यांचे स्वरूप बव्हंशी सगळीकडे सारखेच. आता सास्वा-सुना साहेबाघरच्या असोत, नाहीतर श्रमजीवी वर्गातील असोत. घडणाऱ्या युद्धाचे प्रसंग तेच. तपशिलाबाबत थोडाफार भेदभाव असेल कदाचित्. या प्रसंगाभोवती फिरणाऱ्या दोन घटना सईबाईंनी घेऊन व त्यांची सुंदर मांडणी करून प्रेक्षकांची दिलखुलास पावती घेतली.

नाटकाच्या बदललेल्या स्वरूपाचा आढावा घेण्यासाठी लिहिलेले प्रसंग चांगले असले आणि रंगभूमीवर त्यांची खुलावटही समाधानकारक पद्धतीने होत असली तरी अन्य प्रसंगांशी या भागांचे गणित बरोबर जमत नाही; कारण या प्रसंगांचा अपवाद वगळता बहुतेक सर्व प्रसंग 'तो आणि ती' यांच्याभोवती गुंफलेले आहेत. विशेष आवर्जून उल्लेख केला पाहिजे तो उभ्या संसारी आयुष्याचा आढावा

घेणाऱ्या धावत्या प्रसंगांचा. नुकताच विवाह झालेला आहे. संसाराची स्वप्ने रंगवण्यात दोघेही मग्न आहेत. काळ काही थांबायला तयार नाही. आयुष्य झपाट्याने उतरणीला लागले आहे आणि आता लक्षात येते, की स्वप्नंही स्वप्नंच राहिली आहेत. दोघेही आता मश्गुल आहेत, ती आपली स्वप्ने आपला मुलगा साकार करील. या कल्पनेत विलक्षण वेगाने साकार केलेल्या या प्रसंगांना गतिमानता असल्यानेच प्रेक्षकांवर त्यांचा आणि त्यामागे दडलेल्या कटू सत्याचा खोलवर परिणाम होतो.

प्रयोगात कलावंत चारच पण त्या चौघांनीही बहुढंगी भूमिका रंगवून या आगळ्या-वेगळ्या मिसळीची लज्जत वाढविली आहे. प्रवेशांचे तुकडे अलग करणारे पार्श्वसंगीतही परिणामकारक आहे. प्रकाशयोजना आहे दामू केंकरे यांची. पार्श्वभूमीवर असलेल्या सफेद पडद्यावर प्रेमाचे प्रतीक असलेला बदाम, कुटुंब-नियोजन सूचित करणारा उलटा तांबडा त्रिकोण यांचा त्यांनी प्रसंगानुरूप वापर केला आहे. आयुष्यात आपण कितीही स्वप्ने रंगविली तरी काळ आणि वातावरण यांमुळे ती पूर्ण होऊ शकत नाहीत. स्वप्नांची ही बोथट होणारी धार ! तरीही रंगविण्याची स्वाभाविक प्रवृत्ती, या संदर्भाला साजेसे प्रसंग घडत असताना स्वप्ने पार्श्वभूमीवरील पडद्यावर वर्तुळाकृती दाखवण्यात संयोजकांनी कल्पकता दाखविली आहे.

अशी ही आगळीवेगळी कलाकृती. कुणाला ह्यातील काही भाग रुचेल, काही न रुचेल. पण एक वेगळा प्रयोग सादर केल्याबद्दल या मंडळींचे अभिनंदन केले पाहिजे. नाटकाच्या नावीन्याचा हव्यास असलेली मंडळी हा प्रयोग पाहतीलच. पण चाकोरीबद्ध मार्गाने जाणाऱ्या व्यावसायिक रंगभूमीला उदार आश्रय देणाऱ्या मराठी रसिकांनीही अशा प्रयोगाला दाद दिली तर प्रयोगशील मराठी रंगभूमीची वाटचाल सुलभ होणार आहे. ◻





प्रवेश-पत्रिका रविवारच्या नवशक्तीमध्ये पहा.
लिट्क्विझ वीक्लीचा अंक मोफत मागवा.
**लिट्क्विझ प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई ७**

## चित्रपट

# बंबई रात की बाहों में

हिन्दी चित्रपट व्यवसायाचे आजचे स्वरूप इतके व्यवहारी झाले आहे की, व्यवसायाची कलात्मक अंगे पूर्णपणे बाजूला पडली असून उरला आहे फक्त व्यवसाय. लाखाचे दहा लाख कसे होतील या एकाच विचाराने मंडळी चित्रपट निर्माण करीत आहेत. अशा या व्यवहारी व्यवसायातही एखाद-दुसरा प्राणी धडपडत असतो, कलेचा शोध घेत फिरत असतो. प्रेक्षकांना जीवनातील वास्तवता दाखवण्याचा प्रयत्न करीत असतो. के. ए. अब्बास हे अशा निर्मात्या–दिग्दर्शकांपैकी एक. आणि त्यांची ताजी कलाकृती 'बम्बई रात की बाहोंमें' ही अपवादात्मक चित्रपटांपैकी एक.

आपल्या या चित्रपटात अब्बासमियांनी एका रात्रीतील कथा सांगितली आहे. विविध घटनांद्वारा मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांना हात घातला आहे. जनतेची दुःखे वेशीवर टांगणाऱ्या एका वृत्तपत्राचा अमर हा एक वार्ताहर. आपल्या कामाचा एक भाग म्हणून एका गलिच्छ वस्तीतील असंख्य दुःखांना आपल्या वृत्तपत्रातून वाचा फोडतो. वस्तीचा मालक अनेक व्यवसायांत गुंतलेला करोडोपती असतो. लेख वाचून तो अमरला बोलावून घेतो आणि स्वतःच्या व्यवसायचा प्रसिद्धी अधिकारी म्हणून काम करण्याची त्याला विनंती करतो. भलामोठ्ठा पगार, परदेशगमनाची संधी आणि व्यक्तिगत भावी काळात मिळणारे सुख यांमुळे अमर विचलित होऊन आपल्या पत्नीचा सल्ला घेण्याचा निर्णय घेतो.

दिल्लीहून विमानाने परतत असताना त्याचा परिचय होतो जॉनीशी. अपुरे मार्गदर्शन, नको त्यांचा सहवास आणि पैशाचा हव्यास, यांपायी आयुष्याची नासाडी करणाऱ्या अनेक तरुणांचे प्रतिनिधित्व करणारा हा जॉनी विमानात एका प्रवाशाचा खून करून त्याच्याजवळचे चार लाख रुपये लांबवतो. यापुढे दारू–वाहतुकीचा व्यवसाय न करण्याचा निर्णय घेऊन तो आपल्या काकाचे घर सोडतो. शेवटच्या क्षणी त्याला कळते की, आपले पालनपोषण करणारा माणूस आपला काका, हा नाही. निराशेने ग्रासलेल्या अवस्थेत तो बाहेर पडतो, तो उराशी बाळगलेली हजार स्वप्ने एका रात्रीत साकार करण्यासाठी. जॉनीने ज्या इसमाजवळून ते पैसे चोरलेले असतात, त्यानेही ही रक्कम बँकेतूनच चोरून आणलेली असल्याने तपासाच्या दृष्टीने पोलीस खात्याची चक्रे वेगाने फिरू लागतात. पैशाचा उपभोग घेण्यासाठी बाहेर पडलेला जॉनी आणि जॉनीच्या शोधात पोलीस, असे हे चक्र सुरू होते. भरधाव वेगाने सुसाटपणे मोटार हाकणारा जॉनी अखेरीस आपल्या दोन जिवलगांचे बळी घेऊन अपघातात मरण पावतो. एवढी यातायात करून मिळवलेल्या नोटा चौखूर उधळलेल्या असतात. या सर्व घटना पाहणारी आशा पैशासाठी धावणाऱ्या स्वाभाविक मानवी प्रवृत्तीपासून दूर जाते; आणि वार्ताहर अमर हा मोहाचे डोंगर बाजूला सारून आपल्या व्यवसायाशी प्रामाणिकपणे चिकटून राहतो.

कथेच्या प्रवाहाबरोबर येतात ती कॅबारेट डान्सर लिली, लंगडा दारूवाला चाचा, चहा विकणारा बुढ्ढा मियां, ही वास्तवात आढळणारी मंडळी अब्बासमियांनी जशीच्या तशी पडद्यावर आणली आहेत.

## उत्कृष्ट तंत्र : उत्तम हाताळणी

चित्रपटावर प्रभुत्व आहे तंत्राचे. यशस्वी तंत्राचे मानकरी आहेत चलत् चित्रण दिग्दर्शक रामचंद्र. कथाआशय समजावून सांगण्यासाठी त्यांनी आपला कॅमेरा समर्थपणे वापरला आहे. दिग्दर्शकाच्या कल्पना पूर्णपणे समजावून घेऊन त्या चित्रीत करण्यात त्यांनी यश मिळवले आहे.

मोहन राठोड यांच्या संकलन-कौशल्याचा उल्लेख करणे जरूर आहे. प्रचलित पाश्चात्य संकलन-पद्धतीचा त्यांनी अतिशय कौशल्याने वापर केला आहे. फ्लॅश बॅक आणि प्रवाही प्रसंग यांची त्यांनी उत्तम सांगड घातली आहे.

ही पद्धत सर्वसामान्य हिन्दी प्रेक्षकाला रुचणार नाही. प्रसंगी त्याचा घोटाळाही होईल. तथापि विषयाची गतिमानता लक्षात घेता त्यांनी योजलेली पद्धत उपकारक वाटते. 'रोझी 'वरील बलात्काराची दृश्ये अगदी वेगळ्या, परंतु विलक्षण परिणामकारक पद्धतीने घेतल्याबद्दल के. ए. अब्बास यांचे अभिनंदन करणे जसे आवश्यक, तसेच या घटनेला आवश्यक असलेला 'टेम्पो ' उत्कृष्ट कटस् देऊन निर्माण केल्याबद्दल मोहन राठोड यांचेही अभिनंदन करणे जरूर आहे.

अब्बास यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा बोलक्या व प्रातिनिधिक असल्य आणि तंत्राचा उत्कृष्ट वापर करून त्यांनी आपले चित्र 'सिनेमॅटिक' केले असले तरी काही प्रसंग व व्यक्ती कृत्रीम व साचेबंद वाटतात. उदाहरणादाखल अमर व शेटजी यांच्या भेटीच्या प्रसंगाचा उल्लेख करता येईल. शेटजींनी नकाशावर बाण मारून आपल्या व्यवसायाची क्षितिजे दाखवायची कल्पना हास्यापद म्हटली पाहिजे. हे दोष असूनही एक सुंदर व विचारप्रवर्तक चित्रपट पाहिल्याचे समाधान हा चित्रपट पाहिल्यावर मिळते.

विमल आहुजा (अमर), सुरेखा (आशा), जलाल आगा (जॉनी), रोझी (माधवी), लिली (पर्सिस खंबाटा) हे सर्व कलावंत आपल्या भूमिका गाजवतात.

संगीत दिग्दर्शक कौशिक यांनी पार्श्वसंगीताबाबत विशेष मेहनत घेतल्याचे जाणवते. भारताच्या सद्य:स्थितीवर आधारलेल्या या बोलपटाकडे भारतीय प्रेक्षक पाठ फिरवतील. मग कोणत्या तरी विदेशी चित्रपट–महोत्सवात त्याला एखाद-दुसरे पारितोषिक मिळेल आणि परकीय शिफारशीवर भारतीय प्रेक्षक मॅटिनीला जाऊन जुन्या पुराण्या प्रिन्टचा आनंद नावीन्याच्या गोडीने घेईल. **–शरद गोखले**

## ☐ "विज्ञानांचे विज्ञान"

'विज्ञानांचे विज्ञान' नावाचे एक नवीन शास्त्र रशियात उदयाला आले आहे व त्या विषयाचे तज्ज्ञ डॉ. डोब्रॉव्ह नुकतेच भारताला आले होते, तेव्हा त्यांनी या शास्त्राची थोडी माहिती दिली. गेल्या दहा वर्षांत शास्त्रीय ज्ञान एवढ्या गतीने वाढले आहे की, शास्त्रीय पद्धतीचे योजनाबद्ध नियमन करणे आवश्यक झाले आहे. असे झाले तरच नवीन उदयाला आलेल्या निरनिराळ्या शास्त्रांचा सदुपयोग होऊ शकेल. विज्ञानांचे विज्ञान हा एक नवीन प्रांत असून या विषयावरील पहिले पुस्तक इ. स. १९३९ साली प्रसिद्ध झाले. सोव्हिएट शास्त्रज्ञ गेली ८–१० वर्षे या विषयावर संशोधन करीत आहेत. त्यांनी लावलेले शोध प्रकाशित झाले असून त्यांचा योजनाकारांना बराच फायदा झाला आहे. उदाहरणार्थ, असे सिद्ध झाले आहे की, सध्या ज्या वेगाने विज्ञानात व तंत्रज्ञानात वाढ होत आहे त्या वेगाकडे पाहता त्या पाच वर्षांत विशेषत: खूपच अधिक माणसे काम करण्यासाठी लागतील.

विज्ञानांच्या विज्ञानामुळे देशांच्या होणाऱ्या तंत्रविज्ञानविषयक प्रगतीचेही अनुमान बांधता येते. हिंदुस्थानात या शास्त्राचे अध्ययन होणे महत्त्वाचे आहे. कारण हिंदुस्थानासारख्या ज्या देशात पैसे कमी आहेत व हातात घ्यावयाच्या योजना खूप आहेत तेथे असले अध्ययन उपयुक्त ठरते. सरकारला त्यामुळे कुठल्या विषयावरील संशोधनासाठी पैसे राखावेत हे ठरविता येते.

# टिकलीची गोष्ट

फार फार वर्षांपूर्वी घडलेली गोष्ट आहे ही.

टिकोजी नावाचा एक भला माणूस होता. त्याने घनदाट अरण्यात स्वतःची झोपडी बांधली होती. झोपडीजवळच त्याची थोडीशी शेती होती. या शेतीवर तो आणि त्याची बायको सुखात राहत असत. काही वर्षांनंतर त्यांना एक सुंदर मुलगी झाली. ती मुलगी इतकी नाजुक, गोजिरवाणी होती की त्यामुळे टिकोजीने तिचे नाव 'टिकली' असे ठेवले. टिकलीच्या जन्मामुळे तर टिकोजीच्या सुखात कसलीच कमतरता उरली नाही.

परंतु एका वर्षी आलेल्या बर्फाळ थंडीच्या रूपाने दैवाने डाव साधला. आजूबाजूला सगळीकडे बर्फच बर्फ पसले होते, आणि क्रूर लांडग्यांचे थवेच्या थवे शेताभोवती, झोपडीभोवती घोटाळू लागले होते. त्यांच्या गुरगुरण्यामुळे टिकली भिऊन जाऊन आकांत करीत असे. टिकलीचे सोडा, पण टिकोजी आणि त्याची बायकी यांचीदेखील घाबरगुंडी उडे.

न जाणो एखादा धीट लांडगा झोपडीत शिरून टिकलीला पळवून न्यायचा या भीतीने टिकोजीने झोपडीच्या भोवती फळयांचे भक्कम कुंपण उभारण्याचे ठरवले. बरेच दिवस कष्ट करून त्याने मजबूत कुंपण बांधले आणि सुटकेचा निश्वास सोडला. परंतु दुर्दैवाने लांडग्याची भीती फारशी कमी झाली नाही. कारण मोठ्या प्रयत्नाने ते लांडगे कुंपणामध्ये भगदाडे पाडू

अनंत भावे

लागले. टिकोजी फार अस्वस्थ झाला. कुंपणाच्या पलीकडे एखादा खोल खंदक खणल्यास मात्र लांडग्यांचा नाइलाज् होईल असा विचार करून त्याने तसा खंदक खणायला सुरुवात केली.

परंतु असा खंदक खणणे ही केवढी अवघड गोष्ट आहे हे त्याच्या तावडतोब लक्षात आले. कारण एक तर ती जमीन लोखंडासारखी टणक होती; आणि दुसरे म्हणजे त्या चावऱ्या, थंड हवेत जास्त वेळ काम करणे शक्य नव्हते. तरी त्याने नाइलाजाने काम चालू ठेवले.

एके दिवशी आत्यंतिक थकव्यामुळे एका झाडाला टेकून टिकोजी बसला असताना जवळच कसलीतरी हालचाल झाल्यासारखे त्याला दिसले. उंदीर वगैरे असेल अशा समजुतीने त्याने प्रथम दुर्लक्ष केले. पण नीट न्याहाळून पाहिल्यानंतर त्याला आश्चर्याचा धक्का बसला. एक अतिशय चमत्कारिक दिसणारा बुटका माणूस त्याच्यापासून थोड्या अंतरावर फेऱ्या घालीत होता. टिकोजीचे लक्ष वेधून घेण्याचा त्याचा प्रयत्न चालला होता. टिकोजीचे लक्ष त्याच्याकडे जाताच तो हसला. त्याचे हसणे सहज आणि मनमोकळे नव्हते. धूर्त आणि कपटी माणसे जशी हसतात तसा तो हसला होता. टिकोजी थोडा धावरला. पण धीर करून त्याने विचारले, "कोण तू? इथं कशाला आलास तू? काय पाहिजे तुला?"

"भल्या माणसा घाबरू नकोस." तो बुटक्या टिकोजीला आश्वासन देत म्हणाला. "मी तुला मदत करायला आलो आहे. तुझी परवानगी असेल तर मी तुला हा खंदक खणून देतो."

"खरंच देशील तू खंदक खणून? फार उपकार होतील तुझे आमच्यावर" टिकोजीने अधीरपणे सांगितले.

"हो हो, खंदक खणणं म्हणजे हातचा मळ आहे माझ्या." बुटक्या म्हणाला, "पण माझी एक अट मात्र मान्य करायला हवीस तू"

"कोणती अट?" टिकोजीने विचारले.

"खंदक खणल्यानंतर त्याच्यात पडलेले सगळे पुरुष किंवा नर यांवर तुझा अधिकार आणि त्याच्यात पडलेल्या बायका किंवा माद्या यांच्यावरती राहील माझा अधिकार. आहे कबूल?"

टिकोजी विचारात पडला. बुटक्याची अट मोठी विचित्र होती. त्याने तशी अट का घालावी याचा

उलगडा विचार करूनसुद्धा टिकोजीला झाला नाही. पण खंदक तयार करणे ही लांडग्यांपासून बचाव करण्यासाठी अत्यावश्यक गोष्ट होती. म्हणून बुटक्याची अट मान्य करून त्याची मदत घ्यायचे त्याने ठरवले.

आश्चर्याची गोष्ट अशी की बुटक्याने म्हटल्याप्रमाणे खरोखरच अल्पावधीत चांगला रुंद आणि खोल खंदक खणला. टिकोजीला समाधान वाटले. शिवाय पुढील काही दिवसांत, झोपडीत प्रवेश करण्याच्या प्रयत्नांत जे लांडगे खंदकात पडले ते सारे नर होते. त्यांच्यावर अधिकार टिकोजीचा होता. टिकोजीने त्या लांडग्यांची कातडी विकून भरपूर पैसे कमावले.

एके दिवशी अशीच लांडग्यांची कातडी विकायला तो शहरात गेला होता. त्याची बायको घरात काही कामात मग्न होती. टिकली अंगणात खेळत होती. खेळता खेळता अंगणाचे फाटक उघडून ती कुंपणापर्यंत कधी आली हे तिचे तिलाच समजले नाही. कुंपणामध्ये असलेल्या एका लहानशा फटीतून ती बाहेर पडली. खंदकावर झावळ्या, ठिसूळ फळ्या, गवत, पालापाचोळा घालून आच्छादन केलेले होते. त्यामुळे ती तशीच पुढे आली, आणि आच्छादनावर पाय पडताच एकदम खाली खोल खंदकात पडली.

थोड्या वेळाने टिकोजी बाजारातून परत आला. त्याच्या खिशात कातडी विकून मिळालेले पैसे खुळखुळत होते. मोठ्या खुशीत होता तो. झोपडीपाशी येऊन त्याने बायकोला हाक मारली. पण कसलेच उत्तर आले नाही. चार हाका मारूनदेखील जेव्हा कसलाच प्रतिसाद मिळाला नाही. तेव्हा टिकोजी चरकला. टिकलीदेखील जवळपास कोठे दिसत नव्हती. त्यांचा शोध करीत तो वेड्यासारखा इकडेतिकडे धावू लागला. शेवटी त्याला एके ठिकाणी पावलांचे ठसे दिसले. ठशांच्या दिशेने तो कुंपणाबाहेर पोहोचला. तेथेच एका झाडाखाली त्याची बायको आक्रोश करीत बसली होती. त्याने खंदकात डोकावून पाहिले. तेथे टिकली पडली होती आणि मुळुमुळू रडत होती. खंदकाच्या पलीकडे बुटक्या आनंदाने उड्या मारीत होता आणि 'टिकली आता माझी. टिकली आता माझी' असे ओरडत होता.

बुटक्याचा कावा आता टिकोजीच्या लक्षात आला. एकूण बुटक्याची ती विचित्र अट यासाठी

होती तर. टिकोजी अत्यंत संतापला; पण तो काहीच करू शकत नव्हता. वचनाप्रमाणे टिकली-वर बुटक्याचा अधिकार होता. या भयंकर संकटातून टिकलीची सुटका कशी करावी याचा विचार तो नकळतच करू लागला. आणि अचानक त्याला एक युक्ती सुचली.

तो शांतपणे बुटक्याला म्हणाला, "बुटकेराव; टिकली माझी मुलगी असली तरी ठरलेल्या कराराप्रमाणे तिच्यावर आता तुमचा अधिकार आहे. तुम्ही खुशाल तिला घेऊन जाऊ शकता. पण ती बिचारी रडते आहे. आणि तिला अशी रडताना पाहण्यानं तिच्या आईला आणि मला अत्यंत वेदना होत आहेत. कृपा करून तुम्ही तिला उचलून घ्या. म्हणजे तिचे रडे थांबेल."

"ठीक आहे" असे म्हणून बुटक्याने खंदकात उडी मारली. बुटक्याने उडी मारलेली पाहताच टिकोजीनेदेखील मोठी गर्जना करून त्याच्या पाठोपाठ स्वत: खंदकात उडी मारली. बुटक्याची मान आपल्या मजबूत हातात घट्ट पकडून टिकोजी म्हणाला, "बुटक्या, नीचा आपला करार आठवतो आहे न तुला ?
खंदकात पडलेले सगळे पुरुष माझे. तेव्हा तुझ्यावरसुद्धा आता माझा अधिकार आहे." नंतर टिकोजीने हातातील चाबकाने बुटक्याला फटके मारायला सुरुवात केली. बुटक्या वेदनेने कळवळला, आणि किंचाळला "घे. घे. तुलाच घे तुझी मुलगी मला नको ती. मी पाया पडतो तुझ्या. पण मला आता जाऊ दे इथून."

"खरं म्हणजे मी तुझा प्राणच घेणार होतो." टिकोजी म्हणाला, "पण या वेळी सोडतो मी तुला. पण यापुढं कोणालाही त्रास देणार नाहीस, असं वचन द्यायला पाहिजेस तू."

"मागशील ते वचन देतो मी तुला." बुटक्या गयावया करीत म्हणाला.

"ठीक आहे." असे म्हणून टिकोजीने बुटक्याला धरून खंदका-बाहेर भिरकावले, आणि टिकलीला पोटाशी धरले.

यानंतर टिकोजी, त्याची बायको आणि टिकली सुखात राहू लागली. ●

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## नोव्हेंबर २३ ते ३० राशी-भविष्य

**मेष :** शनी-गुरू-मंगळ हे सारे ग्रह अनुकूल नसूनही हा आठवडा आपणांस अपेक्षेबाहेर यशाचा जाणवेल. अनंत कामे हातावेगळी होतील. प्रवास--बदल अशाही गोष्टी या आठवड्यात घडून येतील.

प्रतिकूल परिस्थितीशी झगडून घवघवीत यश मिळविण्यात तुमच्यातील अनन्य-साधारण कर्तृत्वाचे दर्शन घडते.

कला, साहित्य, नाटच या क्षेत्रांतील व्यक्तींना या वेळचा भाग्यस्थ शुक्र हवं ते मिळवून देईल. आकर्षक करारमदार होतील, नवे क्षेत्र हस्तगत होईल, नवा व्यवसाय-धंदा उभारण्यात अनेक धनिकांचा हातभार लागेल. प्रकृतीवर, मनःस्थितीवर, थोडेफार आघात झाले तरी, अशा बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष द्यायला तुम्हांला वेळच मिळणार नाही.

दि. २५ ते २७ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**वृषभ :** रवि-हर्षल लाभयोग आणि रवी-गुरू शुभयोग तुमचे कार्यक्षेत्र प्रगत बनवतील आणि तुम्हांला अपेक्षेबाहेर लाभ मिळवून देतील, अशी आशा करायला भरपूर जागा आहे.

सौंदर्यप्रसाधने, कला, साहित्य या क्षेत्रांतील व्यक्तींना तर या कालासारखा सर्वांगाने विकासाचा काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल.

शैक्षणिक क्षेत्रात हेवा करण्यासारखे यश लाभेल. सामाजिक व राजकीय कार्यांत आघाडीचे स्थान लाभेल. याच काली--आगामी महिन्याभरातही--स्थावराचा, राहत्या जागेचा, वाहनाचाही प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटावा.

मंगल कार्याला चालना मिळेल.

दि. २४ ते २७ या कालात अनेक योजना आकार घेऊ लागतील.

**मिथुन** : चौथ्या मंगळाची धास्ती खावी असं काहीही घडणार नाही. अधिक परिश्रम करावे लागतील. क्षणाचीही उसंत न घेता अहोरात्र धडपड करावी लागेल. एवढे केलेत की, अनिष्ट ग्रह सहसा तुमच्या वाटेस जाणार नाहीत.

अनवश्यक खर्चाचा लोंढा थांबवण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करायला हवा. नोकरी-धंद्यात सतत मिळतेजुळते घेण्याची सवय बाणवून घ्यायला हवी.

स्थानांतर-स्थित्यंतरही घडेल, आणि त्या स्थित्यंतरामुळेच तुमचे अनेक प्रश्न सुटू शकतील.

नात्यागोत्यातील व्यक्तींच्या कारस्थानाकडे डोळेझाक करून भागणार नाही. सारे व्यवहार जातीने करायला हवेत.

दि. २७ ते २९ येथूनच आशादायक वातावरण दिसायला लागेल.

**कर्क** : आजवर अनेक व्यथा-वेदना अनुभवून अंतर्मुख झालेली तुम्ही माणसे. या वेळचा सूर्य-गुरू योग तुमच्या साऱ्या अनिष्टतेवर पडदा टाकील. शिवाय पराक्रमस्थ मंगळाचा खडा पहारा सुरूच आहे. माघार घेणे, कोणत्याही कठीण कामात कच खाणे, असले प्रकार आता मुळीच घडणार नाहीत. या वेळी आपण कोणत्याही कार्यात हात घातलात तरी ते नेत्रदीपक यश घेऊनच उठेल.

बदली-बढतीचे योग स्पष्टपणे दिसू लागतील. व्यावसायिक दृष्टीने नवे साहस करण्याचे निश्चित ठरेल. प्रतिज्ञेने यश मिळवू असा आत्मविश्वास निर्माण होऊ लागेल.

दि. २७ ते २९ या काळीच आपल्या भव्य योजना आकार घऊ लागतील.

**सिंह** : आठव्या शनीमुळे उद्‌भवलेल्या व्यथा-विवंचना या आठवड्यापासून कमी कमी होऊ लागतील. घरच्या अडचणी लवकरच दूर होण्याची लक्षणे दिसायला लागतील.

केवळ एका सूर्यावरच तुमची सारी भिस्त. तो सूर्य-गुरू-हर्षलशी अंशपूर्ण शुभ-योग करणार असल्यामुळे आपल्या मार्गातील बऱ्याचशा अडीअडचणी दूर होऊ लागतील.

याच आठवड्यात विशेष काही घडेल असे माझे म्हणणे नाही. पण उज्ज्वल भविष्यकाळाची प्रसादचिन्हे मात्र स्पष्टपणे दिसू लागतील.

दि. २५–२६–२७ या कालाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवेल.

**कन्या :** सहजासहजी यश मिळावे अशी ग्रहस्थिती नाही. पण अपयशाची धास्ती मुळीच नाही.

मनामध्ये अनेक बरेवाईट विचार सतत थैमान घालू लागतील. हाती पसा अमाप येऊनही पैशाअडक्याची विवंचना सतत जाणवत राहील.

या काळी कोणाची भरीव मदत लाभेल, या भरवंशावर जाऊ नका. नोकर-चाकर तर कोणत्याही क्षणी दगा देतील.

पराक्रमातील रवी-बुधच तुमचे खरे जिवाभावाचे सोबती. उद्योगधंद्याचे क्षेत्र व्यापक-विस्तृत बनेल, आणि ते यशस्वी ठरत असल्याची जाणीवही व्हायला लागल.

दि. २५ ते २७ विशेष यशदायी काल.

**तूळ :** व्ययस्थानी मंगळ-गुरूचा धिंगाणा सुरू असला तरी त्यातूनही काही चांगले निष्पन्न व्हावे अशीच या वेळची ग्रहस्थिती आहे. प्रवास, स्थानांतर घडेल. नवे अनुकूल क्षेत्र डोळ्यांपुढे दिसू लागेल.

मानसिक अस्वास्थ्य, सांपत्तिक विवंचना यांचा अनुभव मधूनमधून येत राहीलच. पण निर्धाराचे प्रयत्न वाया जातील असे मात्र नाही.

यांत्रिक, विद्युत क्षेत्राशी संबंध असलेल्या व्यक्तींना सध्याचे दिवस आशादायक वाटू लागतील. चित्रपटसृष्टीतील माणसांना मात्र मंदीचे वातावरण सर्वत्र जाणवू लागेल. एकंदरीने काल अनिष्टच आहे पण त्याच्यावरही मात करता येईल.

दि. २३–२५–२७ या कालात विशेष सामर्थ्य आहे याची जाणीव व्हावी.

**वृश्चिक :** या वेळी अनेक महान ग्रह आपणांवर खूष आहेत. तुमच्यांतील कलावंत या वेळी जागा होईल. तुमची जिद्द, तुमचा निर्धार या कालीच पेटून उठेल. यामुळे आपण काहीही केलेत तरी ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल. तुमच्या हयातीतील सर्वोत्तम प्रगतीचा हा. कालखंड आहे.

व्यवसायधंद्याला नवे रंगरूप प्राप्त होईल. प्रगतीच्या मार्गातील अनेक टप्पे ओलांडून आपणांस पुढे जाता येईल. अपयश, अपेक्षाभंग हे सारे शब्द आता आपण विसरू शकता.

दि. २४–२५–२७ या काली अनेक चांगल्या घटना घडू लागतील.

**धनू :** शनी–राहूंचे तुमच्या चतुर्थातून उच्चाटन झाल्याशिवाय आपणांस पूर्णत्वाने स्वास्थ्याचा व समाधानाचा काळ लाभेल असे दिसत नाही.

अनारोग्याच्या तक्रारी, स्थावराच्या विवंचना क्षणभर मिटल्यासारख्या वाटतील, पण हे स्वास्थ्य टिकाऊ नव्हेच. असे असले तरी आपण प्रयत्नांची शिकस्त केलीत तरच थोडेफार तरी यश आपणांस लाभेल.

दूरचा प्रवास, नोकरीत बदल, इतर प्रकार या वेळी टाळाच.

दि. २७ ते २९ थोडेफार बरे दिवस.

**मकर** : तुमच्या प्रयत्नांचे फळ किंवा ग्रहांची कृपा असो. जीवनात केव्हा केव्हा निरतिशय आनंदाचे–अपेक्षासाफल्याचे क्षण निर्माण होत असतात ते वेचून घेण्याची तत्परता दाखवलीत तर जीवन कृतार्थ झाल्यासारखे वाटेल. ही वेळ अनन्यसाधारण अशीच आहे.

भाग्यात गुरू, हर्षल, मंगळ यांचे सामर्थ्य क्षणोक्षणी प्रत्ययास यायला लागेल. अनपेक्षितपणे दूरचा प्रवास घडेल, तुम्हांपैकी काहींना परदेशी जाण्याचा योग यावा.

तुमच्या अंगच्या सुप्त सामर्थ्याचा प्रत्यय यायला लागेल. दैवी कृपेचा लाभ घडेल. पैसा, यश, प्रतिष्ठा काय हवं ते मिळेल.

दि. २५ ते २८ या कालाची नोंद करा.

**कुंभ** : द्वितीयस्थानी शनी-राहू तर त्यांच्याचसमोर गुरू–मंगळ ही ग्रहस्थिती विशेष प्रगतीची आहे असे आपणांस वाटणार नाही. अनवश्यक खर्चाला आळा घालण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करा. न पेलणाऱ्या जबाबदाऱ्या उचलण्याचा प्रयत्न करू नका. या काली थोडेफार जपून वागलात, जुळतेमिळते घेण्याचा प्रयत्न केलात तरच ही वेळ निभावून न्याल.

प्रकृतीची काळजी घ्या. संघर्ष निर्माण होईल असं काही करू नका. उद्योग-धंद्याचे जुने तंत्र बदलण्याची तयारी ठेवा.

दंत, नेत्र विकारांकडे दुर्लक्ष करू नका.

दि. २३ ते २५ या काली अनेकांचे सहकार्य लाभेल.

**मीन** : शिकस्तीचा प्रयत्न करूनही जेव्हा अपेक्षित यश पदरी पडू शकत नाही, तेव्हा वाटू लागते की, एखादी अदृश्य शक्ती असावी. त्यालाच आपण ग्रहस्थितीची प्रतिकूलता समजत असतो.

सध्याचे आपले दिवस असेच आहेत. नकोत त्या कटकटींना तोंड द्यावे लागेल. अपेक्षाभंगाचे प्रकार पदोपदी अनुभवावे लागतील.

भागीदारीचे वातावरण अधिक त्रासदायक बनू लागेल. इष्टमित्रांची नाराजी पत्करावी लागेल. नाक मुठीत धरून वैद्याची, वकिलांची बिलें भरावी लागतील.

आगामी महिन्याभरात आपणांस सतत दक्षता बाळगावी लागेल.

दि. २५ ते २७ थोडेफार अनुकूल दिवस.

तीन बोलक्या घटना....

□ १९३९ मध्ये स्टॅलिनने पोलंडवर हल्ला चढविला.

□ १९५६ मध्ये ख्रुश्चेव्हने हंगेरीचा आवाज बंद पाडला.

आणि आता

□ १९६८ मध्ये कोसिजिनने चेकोस्लोव्हाकियात रणगाडे घुसविले.

समाजवादाच्या नावाखाली साम्राज्यवादाचा आविष्कार घडविणाऱ्या कम्युनिस्ट रशियाच्या मूलप्रेरणांचा मागोवा

व्होल्गा जेव्हा लाल होते

| लेखक | प्रस्तावना | मूल्य |
| --- | --- | --- |
| वि. स. वाळिंबे | ना. ग. गोरे | अठरा रुपये |

१ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाले.

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७-बी, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**